RNI NO. MAHMAR/2020/84035

कायदेविषयक मार्गदर्शन मोफत
संपर्क
ॲड. सिद्धार्थ
MVsc, MBA, LLM
मो नं ९४२२५३९४५१

BAHUJAN SAURABHA

# बहुजन सौरभ

**दि. २७ ऑगस्ट २०२६**



१९५० - डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा विद्यार्थ्यांना संदेश.
१९५५ - शेड्युल कास्ट फेडरेशन कार्यकारी मंडळाची डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या अध्यक्षतेखाली बैठक.

संकलन प्रा. यशवंत दुपटे

गुरूवार २७ ऑगस्ट २०२६ | वर्ष : ६ | अंक : २३७ | दैनिक | किंमत : ₹ ५/-
Thursday, 27 August 2026 | Year : 6 | Issue : 237 | Daily | Rate: Rs. 5/-

## महत्वाच्या बातम्या

### आदिवासी विद्यार्थ्यांसाठी राहुल गांधीचे फडणवीस यांना पत्र

**नागपूर :** महाराष्ट्रातील विविध भागांतून आलेल्या आदिवासी विद्यार्थ्यांच्या प्रलंबित मागण्या आणि विविध समस्यांवर काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना पत्र लिहून थेट हस्तक्षेप करण्याची मागणी केली आहे. गेल्या दहा दिवसांहून अधिक काळापासून उपोषणाला बसलेल्या आदिवासी विद्यार्थ्यांनी पुण्यातील 'छात्रो की गुंज' या कार्यक्रमात समस्या मांडल्यानंतर त्यांच्या समस्या प्रशासनासमोर मांडण्यासाठी राहुल गांधी यांनी हे पत्र लिहिले आहे. राहुल गांधी यांनी पत्रात प्रामुख्याने आदिवासी वसतिगृहांचे जाचक नियम आणि तेथील बिकट परिस्थितीवर बोट ठेवले आहे. दूरवरच्या ग्रामीण व दुर्गम भागातून येणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी शहरांमधील शासकीय वसतिगृह हाच शिक्षणाचा मुख्य आधार असतो. मात्र, ३० वर्षांवरील विद्यार्थ्यांना वसतिगृहात प्रवेश न देण्याच्या नव्या नियमामुळे स्पर्धा परीक्षांची तयारी करणारे आणि उच्च शिक्षण घेणारे अनेक तरुण शिक्षणापासून वंचित राहत असल्याचे त्यांनी नमूद केले. मुख्यमंत्र्यांनी स्वतः आंदोलक आदिवासी विद्यार्थ्यांच्या प्रतिनिधींशी भेट घेऊन त्यांच्या मागण्या ऐकून घ्याव्यात आणि यावर तातडीने सन्मानजनक तोडगा काढावा, असे आवाहनही राहुल गांधी यांनी केले आहे.

### प्रमोद मानमोडे यांचे न्यायधीशांवर आरोप

**नागपूर :** निर्मल उज्ज्वल क्रेडिट को- ऑपरेटिव्ह सोसायटीचे संस्थापक प्रमोद मानमोडे यांनी मुंबई उच्च न्यायालयाचे मुख्य न्या. आणि नागपूर खंडपीठाचे प्रशासकीय न्या. यांच्याकडे तक्रार दाखल करून नागपूर खंडपीठातील न्यायमूर्ती अनिल पानसरे यांच्यावर गंभीर प्रकारचे आरोप केले आहेत. उच्च न्यायालयाने विविध बाबी विचारात घेता मानमोडे यांची ही कृती कठोरतेने हाताळताना संबंधित आरोप म्हणजे न्यायाधीशांवर दबाव आणून न्यायपीठ बदलण्याचा प्रयत्न आहे, असे परखड निरीक्षण नोंदवले आहे. तसेच, मानमोडे यांचा हा प्रयत्न मोडून काढत संबंधित आरोपांवर येत्या १ सप्टेंबरपर्यंत ठोस पुराव्यांसह शपथपत्र दाखल करण्याचे निर्देश दिले आहेत.

### 'आधार' अपडेट न केल्यास मुलाचे रेकॉर्ड येणार धोक्यात...

**चंद्रपूर :** मुलांच्या वयाची ५ आणि १५ वर्षे पूर्ण झाल्यानंतर आधारमधील बायोमेट्रिक माहिती अपडेट करणे आवश्यक आहे. या प्रक्रियेला मॅंडेटरी बायोमेट्रिक अपडेट (एमबीयू) असे म्हटले जाते. यामध्ये मुलांचे हातांचे ठसे, डोळ्यांचे स्कॅन आणि नवीन छायाचित्र आधारमध्ये नोंदविले जाते. एमबीयू वेळेत न केल्यास आधारशी संबंधित विविध सेवांमध्ये अडचणी निर्माण होऊ शकतात. शासकीय योजना, शिष्यवृत्ती आणि अन्य सुविधांसाठी आधारचा वापर होत असल्याने त्याचे अद्ययावतीकरण महत्त्वाचे आहे. त्यामुळे पालकांनी आपल्या पाल्याचे आधार एमबीयू झाले आहे की नाही, याची पडताळणी करणे गरजेचे आहे. एमबीयू प्रलंबित असल्यास जवळच्या अधिकृत आधार केंद्रावर जाऊन प्रक्रिया पूर्ण करता येते. मुलांच्या भविष्यातील शैक्षणिक व शासकीय कामकाजात अडथळे येऊ नयेत, यासाठी पालकांनी वेळीच दक्षता घेणे आवश्यक आहे.

### एमपीएससी पेपरफुटी प्रकरणात तीन अधिकाऱ्यांसह सहा जणांना अटक

**मुंबई :** महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या अन्न व औषध प्रशासन विभागातील औषध निरीक्षक (गट-ब) परीक्षेच्या पेपरफुटी प्रकरणात गुन्हे शाखेने मोठी धडक कारवाई केली. या प्रकरणी एमपीएससीच्या अप्पर सचिवांसह तीन अधिकारी, क्लास संचालक आणि विद्यार्थ्यांच्या नातेवाइकांना अशा एकूण ६ जणांना अटक करण्यात आली. या गैरप्रकारामुळे एमपीएससीने ही परीक्षा रद्द करण्याचा निर्णय घेतला असून, सर्व आरोपींना न्यायालयाने पोलीस कोठडी सुनावली आहे. गुन्हे शाखेने दिलेल्या माहितीनुसार, तपासादरम्यान आरोपी विश्वेश्वर दत्तात्रय नकाते (सहाय्यक कक्ष अधिकारी, एम.पी.एस.सी.), अभिजीत गणपतराव लेंडवे (अवर सचिव, एम.पी.एस.सी.), गोपाळ भट्टु मराठे (सहाय्यक कक्ष अधिकारी, एम.पी.एस.सी.), यांच्यासह प्रविण दिलीप पाटील (संचालक कौटील्य अकादमी, नंदुरबार), अमृत नामदेव पाटील आणि लोकेश उर्फ गौरव राजेंद्र पाटील यांचा गुन्ह्यात सहभाग निष्पन्न झाल्याने त्यांना आज अटक करण्यात आली आहे. न्यायालयाने सर्व आरोपींना २ सप्टेंबर २०२६ पर्यंत पोलीस कोठडी सुनावल्यामुळे, आता पोलीस चौकशीत या रॅकेटचे आणखी कोणते धागेदोरे आणि मोठे चेहरे समोर येतात? याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# नेपाळमध्ये पुराचा हाहाकार



*अनेक गावे आणि जलविद्युत प्रकल्प वाहून गेले, सात जणांचा मृत्यू,*
*१०५ भारतीयांसह २९१ परदेशी नागरिक बेपत्ता.*
*१६४३ विद्यार्थी असलेली एक शाळा कोसळली*
*महापुरामुळे बिहारला 'हाय अलर्ट'*

**नवी दिल्ली :** उत्तर नेपाळमधील भोटे कोसी नदीला बुधवारी अचानक मोठा पूर आला. या नैसर्गिक आपत्तीत आतापर्यंत सात जणांचे मृतदेह सापडले असून, ३८४ पर्यटक बेपत्ता आहेत. बेपत्ता झालेल्यांमध्ये १०५ भारतीय आणि ९३ नेपाळी नागरिकांसह २९१ परदेशी नागरिकांचाही समावेश आहे. नेपाळ पर्यटन विभागाच्या हवाल्याने ही माहिती समोर आली आहे. या पुरामुळे तिबेटला लागून असलेल्या सिंधुपलचोक जिल्ह्यातील अनेक भागांचे मोठे नुकसान झाले आहे. आतापर्यंत प्रसिद्ध झालेल्या आकडेवारीनुसार, १७ जणांचा मृत्यू झाला असून, ४०० जण बेपत्ता आहेत. दरम्यान, प्रधानमंत्री मोदींनी नेपाळचे प्रधानमंत्री बालेन शाह यांच्याशी संपर्क साधून माहिती घेतली आहे. या विध्वंसामुळे घरे, वाहने, पूल, पायाभूत सुविधा आणि अनेक प्रकल्पांचे नुकसान झाले, असे अधिकाऱ्यांनी सांगितले. स्थानिक माध्यमांनी दिलेल्या वृत्तानुसार, शेकडो लोक अजूनही बेपत्ता असून त्यांचा ठावठिकाणा अज्ञात आहे. उत्तर रसुवा येथील सीमा चौकीवर तैनात असलेले नेपाळ सशस्त्र पोलीस दलाचे (एपीएफ) चार जवान अचानक आलेल्या पुरामुळे बेपत्ता झाले आहेत. इतकेच नाही, तर स्थानिक माध्यमांनुसार, नेपाळ पोलिसांचे ३२ जवान आणि रसुवा सीमाशुल्क कार्यालयातील १४ जणांचा संपर्क तुटला आहे. नेपाळच्या स्वतंत्र वीज उत्पादक संघटनेनुसार, पुरामुळे १५ जलविद्युत प्रकल्पांवर परिणाम झाला आहे. यापैकी १० प्रकल्प कार्यरत असून पाच प्रकल्पांचे बांधकाम सुरू आहे.

स्थानिक वेळेनुसार सकाळी ९ वाजण्याच्या सुमारास नदीच्या पाणी पातळीत अचानक वाढ झाल्याचे वृत्त आहे. अधिकाऱ्यांच्या मते, पुराचे पाणी तिबेटमधून आले असावे. सर्वाधिक प्रभावित भागांमध्ये तिमुरे आणि स्याब्रुबेसी या सीमावर्ती वस्त्यांचा समावेश आहे.

'गावे आणि पायाभूत सुविधा प्रकल्पांची ठिकाणे वाहून गेल्याचे अहवाल आम्हाला मिळाले आहेत,' असे रसुवा जिल्हा प्रशासक नरेंद्र परियार यांनी रॉयटर्सला सांगितले. ते पुढे म्हणाले, 'मोठी जीवितहानी आणि मालमत्तेची हानी होऊ शकते. पण मी सध्या खात्रीने काहीही सांगू शकत नाही.'

नेपाळ लष्कराने सांगितले की, पुरामुळे तिमुरे आणि स्याब्रुबेसी भागात मोठ्या प्रमाणावर विध्वंस झाला असून, वाहने, व्यापारी माल आणि इतर मालमत्ता वाहून गेली आहे. रसुवाचे मुख्य सीमाशुल्क अधिकारी, राजेंद्र ढुंगाना यांनी सांगितले की, सीमाशुल्क संकुलात ठेवलेली अनेक वाहने आणि माल वाहून गेला. नुकताच बांधलेला एक पूलही उद्ध्वस्त झाला. काठमांडूपासून सुमारे १२५ किलोमीटर अंतरावर आणि तिबेटच्या सीमेवर असलेला, सुमारे ५०,००० लोकसंख्या असलेला रसुवा हा एक डोंगराळ जिल्हा असून, त्याला आपत्ती निवारण उपाययोजना म्हणून घोषित करण्यात आले आहे. राष्ट्रीय आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाने काय इशारा दिला? राष्ट्रीय आपत्ती जोखीम निवारण आणि व्यवस्थापन प्राधिकरणाने रसुवा, नुवाकोट, धादिंग, चितवन आणि गोरखा येथील नदीकिनारी राहणाऱ्या रहिवाशांना सतर्क राहण्याचा आणि गरज भासल्यास सुरक्षित ठिकाणी स्थलांतरित होण्याचा इशारा दिला आहे. पुराची परिस्थिती लक्षात घेता, नेपाळचे प्रधानमंत्री बलेंद्र शाह यांनी सिंह दरबार येथे एक उच्चस्तरीय बैठक बोलावली. या बैठकीत रसुवा, नुवाकोट, धादिंग, गोरखा आणि चितवन येथील संघीय खासदारांसोबत बचाव आणि मदत कार्यावर सविस्तर चर्चा करण्यात आली. राष्ट्रीय आपत्ती जोखीम निवारण आणि व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीत, प्रधानमंत्रींनी स्पष्ट सूचना दिल्या की सखल किनारपट्टीच्या भागात अतिरिक्त दक्षता ठेवावी आणि विस्थापित लोकांना तात्काळ सुरक्षित ठिकाणी हलवावे.

### नेपाळमध्ये 'जलप्रलय'! महापुरामुळे बिहारला 'हाय अलर्ट'

नेपाळच्या वरच्या बाजुच्या डोंगराळ भागात आणि पाणलोट क्षेत्रात सततच्या मुसळधार पावसामुळे आलेल्या महाप्रलयाचा धोका भारताला आहे. या जलप्रलयामुळे बिहारवर पुन्हा एकदा पुराचा गंभीर धोका निर्माण झाला आहे. नेपाळमधून मोठ्या प्रमाणात पाणी येत असल्यामुळे गंडक नदीचा प्रवाह वेगाने वाढत आहे, त्यामुळे राज्य सरकार आणि प्रशासनाने सावधानतेचा इशारा दिला आहे. जाणकारांच्या अंदाजानुसार, नदीच्या पाणी पातळीतील या वेगाने होणाऱ्या वाढीमुळे * मीटर उंचीच्या लाटा येऊ शकतात. परिस्थितीचे गांभीर्य लक्षात घेता, सर्व बाधित सीमावर्ती आणि मैदानी जिल्ह्यांमध्ये युद्धपातळीवर सुरक्षा व्यवस्था आणि तयारी सुरू करण्यात आली आहे. बिहारचे मुख्य सचिव प्रत्यय अमृत यांनी बिहारमधील संभाव्य पुराच्या तयारीचा आढावा घेण्यासाठी अधिकाऱ्यांसोबत एक तातडीची उच्चस्तरीय बैठक घेतली. संभाव्य पूरग्रस्त जिल्ह्यांचे जिल्हाधिकारी (डीएम), पोलीस अधीक्षक (एसपी) आणि वरिष्ठ अधिकारी व्हिडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे या बैठकीत सहभागी झाले होते. मुख्य सचिवांनी स्पष्ट सूचना दिल्या आहेत की, सर्व प्रशासकीय अधिकाऱ्यांनी आपापल्या भागातील बंधारे आणि नद्यांवर २४ तास लक्ष ठेवावे आणि कोणत्याही संभाव्य परिस्थितीला तोंड देण्यासाठी पुरेशी मदत व बचाव पथके तयार असल्याची खात्री करावी.

गंडक नदीतील पाण्याचा दाब सातत्याने वाढत असल्याने, राज्य सरकारने पश्चिम चंपारण (बेतिया), पूर्व चंपारण (मोतिहारी), गोपालगंज, सारण, मुझफ्फरपूर आणि वैशाली जिल्ह्यांमध्ये उच्च सतर्कता जारी केली आहे. याव्यतिरिक्त, सीतामढी आणि शिवहर यांसारख्या शेजारील जिल्ह्यांमधील प्रशासनांनाही परिस्थितीवर बारकाईने लक्ष ठेवण्यास सांगितले आहे. सर्व जिल्हाधिकाऱ्यांना त्यांच्या भागातील पूल, कमकुवत बंधारे आणि सखल निवासी भागांना नियमितपणे भेट देऊन जनतेला वेळेवर सतर्क करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

### १६४३ विद्यार्थी असलेली एक शाळा कोसळली

**नवी दिल्ली : नेपाळमधील नुवाकोट येथील बिदूरमध्ये, बुधवारी सकाळी त्रिशुली नदीची पाणी पातळी अचानक वाढल्याने त्रिभुवन त्रिशुली माध्यमिक शाळेत घबराट पसरली. त्यावेळी शाळेत १६४३ विद्यार्थी शिकत होते. सकाळी ९:१५ वाजता पुराचा इशारा मिळाला आणि अवघ्या १० मिनिटांनंतर, सकाळी ९:२५ वाजता, नदीचे प्रचंड पाणी आणि मोठ्या लाटा परिसरात पोहोचल्या. शाळा प्रशासनाने तात्काळ विद्यार्थ्यांना सुरक्षित ठिकाणी पाठवले, ज्यामुळे मोठ्या संख्येने मुलांना धोक्यातून वाचवण्यात आले. तथापि, पुरापूर्वी घरी जाण्यासाठी पूल ओलांडलेले काही विद्यार्थी अद्याप सापडलेले नाहीत. पुराचा पूर्व इशारा मिळाल्यानंतर विद्यार्थ्यांना सुरक्षित ठिकाणी हलवल्यामुळे मोठ्या संख्येने विद्यार्थ्यांना धोक्यातून वाचवण्यात आले. मुख्याध्यापकांनी सांगितले की, शाळेतून कॉलनीकडे प्रवास करणारे सर्व विद्यार्थी सुरक्षित आहेत. ते स्वतः, तसेच अंदाजे ३५ ते ४० इतर विद्यार्थी आणि स्थानिक रहिवासी कॉलनी परिसरात सुरक्षित आहेत. तथापि, शाळा प्रशासनाकडे अद्याप सर्व विद्यार्थ्यांच्या स्थितीबद्दल संपूर्ण माहिती नाही.**

जागतिक आरोग्य संघटनेने (WHO) पूरग्रस्तांसाठी आपत्कालीन मदतीची घोषणा केली आहे. आरोग्य आणि अन्न स्वच्छता मंत्री निशा मेहता यांच्या म्हणण्यानुसार, ही संघटना १,००० लोकांसाठी मूलभूत औषधे, आरोग्य उपकरणे आणि प्रत्येकी २४ चौरस मीटरचे १५ आपत्कालीन तंबू पाठवत आहे. याव्यतिरिक्त, काठमांडूच्या बीर रुग्णालय आणि ट्रॉमा सेंटरमध्ये पूरग्रस्तांसाठी १०० आपत्कालीन

### राज्यातील शाळांमधील २० लाख विद्यार्थ्यांच्या डोळ्याची तपासणी

**मुंबई :** राज्यातील शालेय विद्यार्थ्यांच्या डोळ्यांच्या आरोग्याची काळजी घेण्यासाठी राज्य सरकारने महत्त्वपूर्ण पाऊल उचललं आहे. शालेय शिक्षण विभाग तसेच रत्ननिधी चॅरिटेबल ट्रस्ट आणि वनसाईट एस्सिलार लक्सोटिका फाउंडेशन यांच्यामध्ये विद्यार्थ्यांच्या डोळ्यांची तपासणी करण्याबाबत सामंजस्य करार करण्यात आला. या तपासणीनंतर दृष्टीदोष आढळलेल्या गरजू विद्यार्थ्यांना नंबरचे चष्मे मोफत उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुखयमंत्री एकनाथ शिंदे आणि शालेय शिक्षण मंत्री दादा भुसे यांच्या उपस्थितीत सोमवारी सह्याद्री राज्य अतिथीगृह येथे हा करार करण्यात आला. सामंजस्य करारानुसार राज्यातील शासकीय शाळांमधील पाचवी ते दहावीच्या २० लाख विद्यार्थ्यांच्या डोळ्याची तपासणी करण्यासाठी विशेष प्रकल्प राबविण्यात येणार आहे. शालेय शिक्षण विभागामार्फत या प्रकल्पाची अंमलबजावणी करण्यात येईल. रत्ननिधी चॅरिटेबल ट्रस्ट प्रकल्प अंमलबजावणी भागीदार म्हणून कार्य करणार असून वनसाईट एस्सिलार लक्सोटिका फाउंडेशन तांत्रिक भागीदार म्हणून कार्यरत राहील. दृष्टीदोष असलेल्या पात्र विद्यार्थ्यांना मोफत चष्मे उपलब्ध करून देण्याची जबाबदारीही ही संस्था घेणार आहे.

## आरक्षण-शिष्यवृत्तीवर टांगती तलवार
## वैद्यकीय विद्यार्थ्यांचे मुख्यमंत्र्यांना साकडे



**नागपूर :** राज्यातील काही वैद्यकीय महाविद्यालयांना खासगी विद्यापीठाचा दर्जा देण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतला आहे. त्यामुळे अनुसूचित जाती, जमाती व ओबीसी विद्यार्थ्यांमध्ये आरक्षण, शिष्यवृत्ती, फ्रीशिप आणि शुल्क प्रतिपूर्तीचे हक्क हिरावले जाण्याची भीती निर्माण झाली आहे. संस्थेचा दर्जा बदलला तरी विद्यार्थ्यांचे विद्यमान शैक्षणिक व आर्थिक हक्क अबाधित ठेवावेत, अशी मागणी 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर नॅशनल स्टुडंट्स फेडरेशन'ने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे केली आहे.

खासगी विद्यापीठाचा दर्जा देण्याच्या निर्णयात नागपूरचे लता मंगेशकर मेडिकल कॉलेज, एन.के.पी. साल्वे मेडिकल कॉलेजसह राज्यातील इतर वैद्यकीय संस्थांचा समावेश आहे. महाराष्ट्र शासनाच्या २४ ऑगस्ट २०२६ रोजीच्या मंत्रिमंडळ निर्णयानुसार, या दर्जाबदलानंतर आरक्षित प्रवर्गातील विद्यार्थ्यांना मिळणारे आरक्षण, शासकीय शिष्यवृत्ती, ट्युशन फी रिअम्बर्समेंट आणि फ्रीशिपचे लाभपूर्वीप्रमाणेच मिळणार का, याबाबत स्पष्टता नसल्याने विद्यार्थ्यांमध्ये चिंता वाढली आहे. या पार्श्वभूमीवर संघटनेचे कार्याध्यक्ष डॉ. सिद्धांत अर्जुन भरणे यांनी २५ ऑगस्ट रोजी मुख्यमंत्र्यांना निवेदन सादर केले. वैद्यकीय प्रवेशासाठी नीट-यूजी २०२६ ची समुपदेशन प्रक्रिया सुरू असताना शुल्क, आरक्षण आणि शिष्यवृत्तीबाबत स्पष्टता न मिळाल्यास आर्थिकदृष्ट्या दुर्बल तसेच आरक्षित प्रवर्गातील विद्यार्थ्यांच्या प्रवेशावर परिणाम होण्याची शक्यता व्यक्त करण्यात आली आहे.

त्यामुळे धोरण निश्चित होईपर्यंत अंतरिम आदेश काढून विद्यमान लाभ कायम ठेवावेत आणि प्रवेश प्रक्रिया पूर्ण होण्यापूर्वी स्पष्ट शासन निर्णय जारी करावा, अशी मागणी संघटनेने केली आहे.

यापूर्वी 'बापू सुपडू थोरात विरुद्ध महाराष्ट्र शासन' या प्रकरणाचा संदर्भ देण्यात आला आहे. डीम्ड विद्यापीठांमधील पात्र विद्यार्थ्यांना शुल्क प्रतिपूर्तीच्या लाभापासून वंचित ठेवणे अयोग्य असल्याचा निर्णय मुंबई उच्च न्यायालयाने दिला होता. या निर्णयाविरोधातील राज्याची विशेष अनुमती याचिका सर्वोच्च न्यायालयाने १४ नोव्हेंबर २०१९ रोजी फेटाळली होती.

> 'संस्थेला खासगी विद्यापीठाचा दर्जा मिळाला म्हणून त्याची किंमत विद्यार्थ्यांनी का मोजावी? लता मंगेशकर व एन.के.पी. साल्वे वैद्यकीय महाविद्यालयातील एससी/एसटी/ओबीसी विद्यार्थ्यांची शिष्यवृत्ती, फ्रीशिप व फी-प्रतिपूर्ती केवळ दर्जाबदलामुळे बंद होऊ नये. नीट-यूजी २०२६ प्रवेशाच्या पार्श्वभूमीवर शासनाने तातडीने स्पष्ट आदेश काढून आरक्षणासह सर्व लाभ अबाधित राहण्याची हमी द्यावी.'
>
> **- डॉ. सिद्धांत भरणे**

## साखरेची भाव वाढ! साठेबाजांवर धाडी



**नागपूर :** सर्वसामान्यांच्या घरखर्चाचा गोडवा कडवट झाल्यानंतर आता केंद्र आणि राज्य सरकारने साठेबाजांविरोधात कडक मोहीम हाती घेतली आहे. महाराष्ट्रात अन्न व नागरी पुरवठा विभागाच्या अधिकाऱ्यांकडून शहरासह ग्रामीण भागातील साखर कारखाने आणि मोठ्या व्यापाऱ्यांच्या साठ्याची अचानक तपासणी सुरू करण्यात आली : साखरेच्या दरवाढीने आहे. जिल्हा पुरवठा अधिकाऱ्यांना पथके तयार करून प्रत्यक्ष साठा पडताळण्याचे आदेश देण्यात आले आहेत. या मोहिमेमुळे सर्वसामान्यांना दिलासा मिळणार आहे.

गेल्या काही आठवड्यांत साखरेच्या दरात झपाट्याने वाढ झाली. महाराष्ट्रात २० ऑगस्टला किरकोळ साखरेचा दर सुमारे ६२ रुपये होता, तो दोन दिवसातच ७२ रुपयांवर पोहोचला. मंगळवारी भाव ६२ रुपयांपर्यंत खाली आल्यानंतरही व्यापारी जास्त दरातच विक्री करीत आहेत.

कारवाईनंतर सरकारने मोठ्या प्रमाणावर साखर वापरणाऱ्या ग्राहकांवरही निर्बंध कडक केले आहेत. महिन्याला १० टनांपेक्षा अधिक साखर वापरणाऱ्या मोठ्या ग्राहकांना १ सप्टेंबरपासून १५ दिवसांच्या गरजेपुरताच साठा ठेवता येणार आहे. ही मर्यादा ३० नोव्हेंबरपर्यंत लागू राहील.

केंद्र सरकारने १ ऑगस्ट ते ३० नोव्हेंबर या कालावधीसाठी साखर व्यापाऱ्यांवर साठा मर्यादा लागू केली आहे. कोणत्याही व्यापाऱ्याला ४,००० क्विंटल अर्थात ४०० टनांपेक्षा अधिक साखर साठवता येणार नाही. तसेच खरेदी केलेला साठा ३० दिवसांपेक्षा अधिक काळ ठेवता येणार नाही. व्यापाऱ्यांना आपला साठा केंद्राच्या वेबसाइटवर जाहीर करून त्याची नियमित माहिती अद्ययावत करणे बंधनकारक करण्यात आले आहे.

## महाबोधी महाविहारासाठी आंदोलन

**पाटणा :** महाबोधी महाविहार बोधगया मुक्ती आंदोलन राष्ट्रीय समितीच्या वतीने बोधगया टेम्पल मॅनेजमेंट कमिटी (BTMC) ॲक्ट १९४९ रद्द करून महाबोधी महाविहाराचे व्यवस्थापन बौद्ध समुदायाच्या ताब्यात देण्याच्या मागणीसाठी २३ ते २७ ऑगस्टदरम्यान पटना येथे पाच दिवसीय भूक हडताल सुरू करण्यात आली होती. आंदोलनाच्या पहिल्याच दिवशी बिहारचे मुख्यमंत्री सम्राट चौधरी यांनी प्रतिनिधी मंडळाला भेटीसाठी आमंत्रित केले. पटना जिल्हाधिकाऱ्यांच्या माध्यमातून राष्ट्रीय अध्यक्ष भदंत प्रज्ञाशील महाथेरो, राष्ट्रीय महासचिव डॉ. आकाश लामा, भंते सुनीत पाल थेरो आणि सिक्कीम राज्याचे समन्वयक लामा ओगदी पिंसो यांनी मुख्यमंत्री सम्राट चौधरी यांची भेट घेतली. महाबोधी महाविहार बौद्ध समुदायाचे असून, या प्रश्नावर सरकार प्राधान्याने विचार करेल, असे आश्वासन मुख्यमंत्र्यांनी दिल्याचे समितीने सांगितले. त्यानंतर उपोषण स्थगित केले आहे.




**मुख्यमंत्री सम्राट चौधरी यांचे आश्वासन**

महाबोधी महाविहाराच्या व्यवस्थापनासाठी बौद्ध समुदायाचा हक्क मिळविण्याचा लढा १८९५ पासून सुरू असल्याचे समितीने सांगितले. १९४९ मध्ये लागू करण्यात आलेल्या BTMC ॲक्टनुसार चार बौद्ध, चार गैर-बौद्ध सदस्य आणि जिल्हाधिकारी पदेन अध्यक्ष अशी व्यवस्था आहे. हा कायदा रद्द करून महाविहाराचे संपूर्ण व्यवस्थापन बौद्धांच्या ताब्यात देण्याची मागणी आहे.

या मागणीसाठी रिट पिटीशन क्र. ३८०/२०१२ तसेच भदंत धम्मशिखर यांनी २०१८ मध्ये इंटरवेंशन पिटीशन क्र. ९१०४८/२०१८ दाखल केली. २०१९ मध्ये भारतीय बौद्ध महासभेच्या वतीने भदंत धम्मशिखर व डॉ. चंद्रबोधी पाटील यांनी न्यायालयीन पाठपुरावा केला.

आंदोलनाचे नेतृत्व राष्ट्रीय अध्यक्ष भदंत प्रज्ञाशील महाथेरो, राष्ट्रीय उपाध्यक्ष व सर्वोच्च न्यायालयातील याचिकाकर्ते भदंत धम्मशिखर, राष्ट्रीय महासचिव डॉ. आकाश लामा, भंते सुनीत पाल थेरो, डॉ. चंद्रबोधी पाटील, राष्ट्रीय महासचिव शंकर ढेंगरे आणि समता सैनिक दलाचे राष्ट्रीय अध्यक्ष सुनील सारिपुत्र यांनी केले. भदन्त नागदीपांकर महाथेरो, प्रकाश दार्शनिक, ऑल इंडिया बुद्धिष्ट फोरम तसेच विविध बौद्ध संघटनांच्या पदाधिकाऱ्यांनीही आंदोलनासाठी अथक परिश्रम घेतले.

सरकारने महाबोधी महाविहाराचे व्यवस्थापन बौद्ध समुदायाच्या ताब्यात देण्यासाठी ठोस निर्णय न घेतल्यास भविष्यात दिल्ली येथे मोठे आंदोलन करण्याचा इशारा भदंत धम्मशिखर यांनी दिला. महाबोधी महाविहाराची मुक्ती हा बौद्ध समाजाच्या अस्मिता व स्वाभिमानाचा प्रश्न असल्याचे त्यांनी सांगितले.

बहुजन सौरभ

## इथे संपर्क साधावा

- **प्रवीण गायकवाड**
09850301528
विश्वकर्मा नगर, कुकडे लाऊड, वंजारीनगर, एम्प्रेस मिल कॉलनी
- **निलेश कांबळे**
मो. 94236 34976
**एरिया :** उंटखाना, दत्तात्रयनगर, सुभेदार ले आउट, म्हाळगीनगर
- **सुनील कुंभारे**
मो. 98238 94329
- **विशाखा नारायणे**
मो. 99602 41648
**एरिया :** जोगी नगर, काशी नगर, धाडीवाल ले आऊट, सुयोग नगर, रानवाडी
- **प्रमोद चहांदे**
मो. 9273170800
जोगी नगर, धाडीवाल ले आऊट, संयोग नगर, नरेंद्र नगर,
- **चंदू नगरारे**
मो. 9975968852
शताब्दी नगर, काशी नगर, अभयनगर, जयवंतनगर, भीम नगर, जोगी नगर.
- **निलेश वालदे**
मो.9764772886
मोहन नगर. गौतम नगर, गड्डीगोदाम परिसर
- **मसारकर**
मो. 918080158604
धाडीवाल ले आउट.
- **लिना विनोद भोवते**
मो.9021770694
इंदोरा, जरीपटका, भीमचौक, नाराघाट.
- **प्रविण राजाराम ठवरे**
मो. 9372331798
मॉडेल टॉऊन, बेझनबाग.
- **रितेश अनिल बोदेले**
मो. 9511843694
WCL पॉव ग्रीड
- **गगन प्रताप नाहारकर**
मो. 8793389936
मेकोसाबाग, नवा नकाशा.
- **प्रमोद बागडे**
मो. 9764973627
इंदोरा, सुगत नगर.
- **बी प्रकाश राव**
मो. 9022621075
भीमचौक, बेझनबाग, मेकोसाबाग.
- **पुष्पीत कराडे**
मो. 8055416108
वैशाली नगर, राणी दुर्गावती चौक.
- **राहुल राजकुमार जांबुळकर**
मो. 9673392025, नारी.
- **श्रीकांत वासनिक**
मो. 9767624345
काचीपूरा, बाबूळखेडा, पार्वती नगर, रमा नगर, जय भिम नगर.
- **मंगेश शंभरकर**
मो. 9970258703
नरेंद्र नगर, सुयोग नगर, भिम नगर, शताब्दी नगर.
- **निळकंठ वि. जवादे**
मो. 9623773365
रमा नगर, मनीष नगर.
- **विनोद कृष्णराव डूले**
वेदांगा न्यूजपेपर, झिंगाबाई टाकळी, गोधनी रोड, .
मो. 7447767922
- **आशिष थुल**
मो. 9423400956
धरमपेठ, आंबेडकरनगर
- **राम मानवटकर**
मो. 8626037360,
न्यू. मनिष नगर
- **अमन शरणागत**
मो.9575673895
टेकअप सिटी, दिघोरी, बहादूरा पेपर एजन्सी,
- **राहुल आठवले**
मो.8485854398
संबोधी बुद्ध विहार, गिट्टीखदान, काटोल रोड, नागपूर
- **दिगाबर पांडुरंग वासनिक**
मो.9561974131
454- नविन सुभेदार ले आऊट
दिनेश पेपर एजन्सी
- **गौतम भीमराव मेश्राम**
जयवंत नगर, अभयनगर
मो. 9975941830
- **स्वप्निल वाढबुधे**
न्यू अमर नगर, शेषनगर, विठ्ठल नगर, सिद्धेश्वरी नगर, चक्रपाणी नगर, गजानन नगर. मो. 96046 54382
- **योगेश मेहर**
टेक ऑफ सिटी, बहादुरा परिसर
मो. 919552971648
- **दिनेश टेंभुर्णे**
इंदोरा, लष्करी बाग, बेझनबाग, पी. डब्ल्यू ए. कॉलेज परिसर
मो. 8806511702
- **गजानन गायकवाड**
कार्तिक मार्टड्ढ, बेसा सेंटर, पेट्रोल पंप जवळ, बेसा
मो.9921552488
- **राजेश नंदनवार**
राहुलनगर, सोमलवाडा
मो. 9850335018
- **विनायक हाडके**
प्रतापनगर
मो.न.9545750757
- **शैलेश माटे**
जयताळा, त्रिमूर्ती नगर, अंबाझरी मो. 9767987363
- **संदिप टेंभुरकर**
समता नगर, नारा रोड नागपूर
मो. 8657565247
- **विनोद जंगले**
हनुमान नगर, नागपूर
मो. 9545641801

“ विचार सकारात्मक असतील तर परिणामही सकारात्मकच असतो... ”



## बहुजन सौरभ संपादकीय

# ओबीसी आरक्षणावर टांगती तलवार!

यूपीएससी नागरी सेवा परीक्षा-2025 मधील 958 यशस्वी उमेदवारांच्या IAS, IPS, IFS आणि अन्य केंद्रीय सेवांमधील वाटपाचा प्रश्न सर्वोच्च न्यायालयात पोहोचला आहे. ओबीसी क्रीमी लेयरच्या निकषासंदर्भात 11 मार्च 2026 रोजी सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या निर्णयाची अंमलबजावणी CSE-2025 मध्ये कशी करायची, यावर केंद्र सरकारने स्पष्टीकरण मागितले आहे. या प्रकरणासाठी विशेष खंडपीठ स्थापन करण्यास सर्वोच्च न्यायालयाने सहमती दर्शविली आहे.(हा केवळ 958 उमेदवारांच्या सेवा वाटपाचा प्रश्न नाही. हा प्रश्न देशातील सामाजिक न्यायाच्या संपूर्ण व्यवस्थेच्या विश्वासार्हतेशी जोडलेला आहे. आरक्षण ही कोणत्याही सरकारची दया किंवा उपकाराची योजना नाही; तो संविधानाने मान्य केलेला सामाजिक न्यायाचा अधिकार आहे. त्यामुळे आरक्षणाच्या पात्रतेचे निकष ठरवताना प्रशासनाची सोय नव्हे, तर संविधानाचा उद्देश केंद्रस्थानी असला पाहिजे. 11 मार्चच्या निर्णयात सर्वोच्च न्यायालयाने अत्यंत महत्त्वाची भूमिका मांडली. पालकांचे केवळ वेतन किंवा उत्पन्न हेच ओबीसी क्रीमी लेयर ठरविण्याचे एकमेव निकष असू शकत नाहीत. पालकांचे पद, सामाजिक स्थिती आणि उत्पन्न-संपत्तीशी संबंधित निकष यांचा एकत्रित विचार करणे आवश्यक आहे. सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रम किंवा खासगी क्षेत्रात काम करणाऱ्या पालकांच्या मुलांना केवळ त्यांच्या उत्पन्नाच्या आधारावर क्रीमी लेयरमध्ये टाकणे योग्य नाही, असे न्यायालयाने स्पष्ट केले आहे. मग केंद्र सरकारला अडचण नेमकी कुठे आहे? CSE-2025 ची अधिसूचना 22 जानेवारी 2025 रोजी निघाली. प्राथमिक परीक्षा 25 मे 2025 रोजी, मुख्य परीक्षा ऑगस्टमध्ये झाली आणि अंतिम निकाल 6 मार्च 2026 रोजी जाहीर झाला. त्यानंतर अवघ्या पाच दिवसांनी सर्वोच्च न्यायालयाचा हा निर्णय आला. त्यामुळे सरकारचा युक्तिवाद असा आहे की परीक्षा प्रक्रिया ज्या नियमांनुसार सुरू झाली, त्याच नियमांनुसार सेवा वाटप पूर्ण करावे. हा मुद्दा कायदेशीरदृष्ट्या विचारात घेण्यासारखा असला, तरी त्यातून एक अस्वस्थ करणारा प्रश्न उभा राहतो - जर एखादा निकष न्यायालयाच्या दृष्टीने चुकीचा किंवा अपुरा ठरला, तर केवळ परीक्षा प्रक्रिया सुरू झाली होती म्हणून तोच निकष पुढेही चालू ठेवायचा का? कायदा हा प्रशासकीय सोयीसाठी वाकवण्याची वस्तू नाही. न्यायालयाने एखाद्या तरतुदीचा अर्थ स्पष्ट केला असेल, तर त्या निर्णयाचा परिणाम कुठे आणि कसा होणार, याचे तर्कसंगत उत्तर सरकारने शोधले पाहिजे. ‘प्रक्रिया सुरू झाली होती’ हा युक्तिवाद सामाजिक न्यायाच्या मूलभूत तत्त्वावर मात करू शकत नाही. सरकारने आणखी एक मुद्दा मांडला आहे. काही उमेदवारांनी जुन्या निकषांनुसार स्वतःला OBC-NCL साठी अपात्र समजून सामान्य प्रवर्गातून अर्ज केला असू शकतो. काहींनी OBC प्रवर्गाचा अर्जच केला नसेल. त्यामुळे वयोमर्यादा सवलत किंवा अतिरिक्त प्रयत्नांचा लाभ न घेणाऱ्या उमेदवारांवर अन्याय होऊ शकतो. हा प्रश्न निश्चितच गंभीर आहे. परंतु त्यावर उपाय शोधण्याची जबाबदारी सरकारची आहे; उपाय म्हणून सामाजिक न्यायाची दिशा उलटी करणे हा पर्याय असू शकत नाही. सर्वात धक्कादायक बाब म्हणजे 958 उमेदवारांचे सेवा वाटप रखडल्याने प्रशिक्षण, कॅडर वाटप, वरिष्ठता आणि वेतन निर्धारणासह प्रशासकीय प्रक्रियांवर परिणाम होण्याची शक्यता आहे. लाल बहादूर शास्त्री राष्ट्रीय प्रशासन अकादमीतील प्रशिक्षणालाही विलंब होऊ शकतो. परंतु येथे सरकारला एक गोष्ट स्पष्टपणे सांगावी लागेल, प्रशासकीय सोय ही संविधानिक न्यायापेक्षा मोठी नाही. ओबीसी समाजाला आरक्षण का द्यावे लागले, याचा इतिहास सरकारने विसरू नये. सामाजिक, शैक्षणिक आणि प्रतिनिधित्वाच्या असमानतेमुळे आरक्षणाची आवश्यकता निर्माण झाली. त्यामुळे क्रीमी लेयरचा प्रश्न फक्त ‘कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न किती?’ एवढ्यावर संपत नाही. सामाजिक वास्तव, पालकांचा दर्जा, पद, व्यवसाय आणि आर्थिक परिस्थिती या सर्वांचा वस्तुनिष्ठ विचार करणे आवश्यक आहे. आज 958 उमेदवारांचा प्रश्न आहे; उद्या हा प्रश्न लाखो विद्यार्थ्यांच्या भवितव्याचा होऊ शकतो. प्रत्येक मोठ्या स्पर्धा परीक्षेनंतर आरक्षणाच्या नियमांवर वाद निर्माण झाला, तर विद्यार्थ्यांमध्ये असुरक्षितता वाढेल. वर्षानुवर्षे अभ्यास करून परीक्षा देणाऱ्या तरुणांच्या भविष्याशी अशी अनिश्चितता खेळू शकत नाही. सरकारने ओबीसी आरक्षणाच्या प्रश्नाकडे राजकीय चष्म्यातून पाहणे तातडीने थांबवावे. कोणत्याही समाजाच्या आरक्षणाच्या हक्कावर घाला घालणे किंवा दुसऱ्या समाजाविरुद्ध असंतोष निर्माण करणे हा या प्रश्नाचा मार्ग नाही. उलट सर्व प्रवर्गांना समान, स्पष्ट आणि पारदर्शक नियम मिळतील, अशी व्यवस्था निर्माण करणे ही सरकारची घटनात्मक जबाबदारी आहे. सर्वोच्च न्यायालयाने विशेष खंडपीठ स्थापन करण्याची भूमिका घेतली आहे, ही योग्य बाब आहे. मात्र या खंडपीठासमोरचा प्रश्न केवळ 958 उमेदवारांचे सेवा वाटप एवढाच मर्यादित राहू नये. ओबीसी क्रीमी लेयरचा निकष भविष्यात कोणत्या वैज्ञानिक, सामाजिक आणि घटनात्मक आधारावर ठरवायचा, यावरही स्पष्ट दिशा मिळणे गरजेचे आहे. आरक्षणाच्या नावावर संभ्रम, विलंब आणि प्रशासकीय गोंधळ निर्माण करण्याची वेळ आता संपली पाहिजे. सामाजिक न्याय हा प्रयोगशाळेतील प्रयोग नाही आणि मागासवर्गीय तरुणांचे भविष्य हे सरकारी फाइल नाही. सरकारने पारदर्शक भूमिका घ्यावी, सर्वोच्च न्यायालयाने स्पष्ट मार्गदर्शन करावे आणि OBC-NCL निकषांबाबत दीर्घकालीन, वैज्ञानिक व संविधानसुसंगत धोरण निश्चित करावे. कारण प्रश्न फक्त 958 उमेदवारांचा नाही. प्रश्न आहे - या देशात संविधानाचा सामाजिक न्याय जिंकणार की प्रशासकीय सोय?●●

# वय वाढणे हा गुन्हा नाही; शिक्षण घेताना वय वाढते, संधी हिरावून घेऊ नका!



माझा साधा प्रश्न आहे, एमपीएससी आणि यूपीएससीसारख्या परीक्षांना अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांना ३५ वर्षांपर्यंत संधी असेल, तर त्या परीक्षांच्या तयारीसाठी मिळणाऱ्या शिष्यवृत्तीची वयोमर्यादा ३० वर्षे का? हा निर्णय नेमका कोणत्या स्तरावर घेण्यात आला, हे स्पष्ट झालेले नाही. अंतिम धोरणात्मक निर्णय घेण्याचा अधिकार मंत्रिमंडळाला असतो. मात्र निर्णय कोणत्याही स्तरावरचा असो, तो घेण्यापूर्वी सामाजिक न्यायाची बाजू समजून घेणे आवश्यक आहे. वय वाढणे हा गुन्हा नाही! अनुसूचित जातीतील अनेक विद्यार्थी ग्रामीण, दुर्गम आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल कुटुंबांतून शिक्षण घेतात. अनेकांना शिक्षणाबरोबर शेती, मजुरी किंवा इतर कामे करावी लागतात. आर्थिक अडचणींमुळे शिक्षणात खंड पडतो आणि पदवी पूर्ण होईपर्यंत वय वाढते. काही विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षांची माहितीच पदवी पूर्ण झाल्यानंतर मिळते. त्यामुळे ते ३०, ३१ किंवा ३२ वर्षांचे झाल्यानंतर तयारी सुरू करतात. त्यांचे वय वाढले म्हणून त्यांचा काय दोष? शिक्षण घेताना वय वाढणे हा गुन्हा नाही. प्रतिकूल परिस्थितीवर मात करून उशिरा का होईना, स्पर्धा परीक्षेची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्याला केवळ वयाच्या एका आकड्यामुळे संधी नाकारणे हे सामाजिक न्यायाच्या उद्देशालाच छेद देणारे आहे. अनुसूचित जातींना शतकानुशतके शिक्षणापासून वंचित ठेवण्यात आले. त्यामुळे एखादा विद्यार्थी उशिरा शिक्षण पूर्ण करतो, त्यामागची सामाजिक, आर्थिक आणि शैक्षणिक पार्श्वभूमी शासनाने समजून घेतली पाहिजे. ज्यांच्यावर इतिहासाने अन्याय केला, त्यांच्या वाढलेल्या वयाची शिक्षा आजच्या शासनाने का द्यावी?

> अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षांच्या तयारीसाठी समाज कल्याण विभागामार्फत दिल्या जाणाऱ्या शिष्यवृत्तीची वयोमर्यादा ३५ वरून ३० वर्षे करण्यात आल्याचे वृत्त समोर आले आहे. त्यामुळे विद्यार्थी आणि सामाजिक क्षेत्रातून असंतोष व्यक्त होत आहे.

निर्णय घेण्यापूर्वी अभ्यास झाला का? वयोमर्यादा कमी करण्यापूर्वी ३० ते ३५ वयोगटातील किती विद्यार्थी या योजनेचा लाभ घेतात, त्यांची सामाजिक-आर्थिक परिस्थिती काय आहे आणि मागील वर्षांत शिष्यवृत्तीधारक विद्यार्थ्यांचे यश किती आहे, याचा अभ्यास झाला आहे का? असा वस्तुनिष्ठ अभ्यास न करता निर्णय घेतला असेल, तर शासनाने त्याचा फेरविचार करावा. सामाजिक न्याय म्हणजे योजना जाहीर करणे नव्हे; तर सर्वात वंचित विद्यार्थ्यालाही त्या योजनेपर्यंत पोहोचता येईल अशी व्यवस्था करणे होय. समाज कल्याणाचा पैसा विद्यार्थ्यांसाठीही खर्च करा. समाज कल्याण विभागाच्या निधीतून विविध उत्सव, सांस्कृतिक आणि गीतांचे कार्यक्रम आयोजित केले जातात. महाड सत्याग्रहाच्या निमित्ताने दीक्षाभूमीवर गीतांचा कार्यक्रम आयोजित करण्यासाठीही निधी खर्च करण्यात आला होता. सामाजिक-सांस्कृतिक कार्यक्रमांना विरोध नाही. पण आर्थिक परिस्थिती हलाखीची असलेल्या अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांच्या शिक्षणासाठी आणि स्पर्धा परीक्षांच्या तयारीसाठी हा पैसा खर्च झाला, तर त्यात गैर काय आहे?



अनिल वैद्य
माजी न्यायाधिश
मो. 9657758555

एखाद्या विद्यार्थ्याला अधिकारी बनण्यासाठी दिलेली आर्थिक मदत ही केवळ मदत नसून सामाजिक परिवर्तनातील गुंतवणूक आहे. तसेच, सरकारचा सर्व पैसा केवळ उच्चवर्णीय नागरिकांच्या खिशातून येतो आणि अनुसूचित जाती-जमाती त्यावर अवलंबून आहेत, असा गैरसमज शासनाने करून घेऊ नये. अनुसूचित जाती-जमातीतील लाखो नागरिक नोकरी, व्यवसाय आणि विविध क्षेत्रांत काम करतात आणि आपल्या उत्पन्नातून आयकर व इतर कर भरतात. म्हणून सामाजिक न्यायाच्या योजनांवर होणारा खर्च हा कोणावर केलेला उपकार नाही; तो सार्वजनिक निधीचा न्याय्य वापर आहे. उत्सवांवर खर्च करण्यापेक्षा एखाद्या गरीब विद्यार्थ्याला अधिकारी बनण्यासाठी मदत केली, तर त्याचा परिणाम अनेक पिढ्यांवर होऊ शकतो. सामाजिक न्यायाच्या नावाखाली संधी कमी करू नका. आज वयोमर्यादा ३५ वरून ३० केली, तर उद्या ती आणखी कमी होण्याचा पायंडा पडू शकतो. हा केवळ पाच वर्षांचा प्रश्न नाही; हा सामाजिक न्यायाच्या धोरणाची दिशा ठरवणारा प्रश्न आहे. म्हणून वयोमर्यादा कमी करण्यापूर्वी विद्यार्थ्यांचा सामाजिक-आर्थिक अभ्यास करावा, शिष्यवृत्तीधारकांच्या यशाचे विश्लेषण करावे आणि विद्यार्थी व सामाजिक संघटनांशी चर्चा करावी. वंचितांच्या संधी कमी करणारे निर्णय मनुवादी व्यवस्थेच्या विचारांना बळ देणारे ठरू नयेत, एवढीच माफक अपेक्षा आहे.

**शासनाकडे स्पष्ट मागणी :** एमपीएससी आणि यूपीएससीसाठी अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांना ३५ वर्षांपर्यंत संधी असेल, तर स्पर्धा परीक्षेच्या तयारीसाठीच्या शिष्यवृत्तीची वयोमर्यादाही किमान ३५ वर्षे असावी आणि ३० वर्षांची मर्यादा तातडीने मागे घ्यावी. वय वाढणे हा गुन्हा नाही.●●

# राजीवजी गांधी यांचा बडा माडिया भागात न झालेला दौरा एक टर्निंग पॉईंट

एक आठवण

काँग्रेस पार्टीचे शहर अध्यक्ष प्रफुलजी गुडधे पाटील यांनी 20 ऑगस्ट 2026 ला एका बैठकीचे आयोजन केले होते. पूर्व प्रधानमंत्री राजीव गांधी यांची जयंतीचे निमित्ताने, नागपूर शहराचा विकास, Right to City, Urban Transformation Group या संकल्पनेवर कृती कार्यक्रम तयार करण्याबाबत चर्चा होती. माझे माहितीप्रमाणे हे पहिल्यांदा घडत होते. शहरातील वेगवेगळ्या क्षेत्रातील मान्यवर व विषय तज्ज्ञ व्यक्ती उपस्थित होते. डॉ. सुखदेव थोरात होते. शहर रचनाकार, अभ्यासक, तज्ञ तसेच वृत्तपत्राचे प्रतिनिधी उपस्थित होते.



2. निमंत्रणावरून मी सुद्धा सहभागी झालो होतो. शहराच्या विकासाचे विषय होते. नेहमीप्रमाणे, शोषित वंचितांच्या वस्त्या, स्लम मध्ये मूलभूत सेवा सुविधा, त्यांचे शिक्षण, आरोग्य, रोजगार, उपजीविकेचे, जगण्याचे प्रश्न, बजेट, खर्च आणि कुठे? प्रशासनाचे दायित्व, बंद शाळा, शाळेत सुविधा, शिष्यवृत्ती इत्यादी विषय मांडले. विकास हा व्यक्ती, कुटुंब व क्षेत्राचा आणि तोही सर्वसमावेशक असला पाहिजे. बजेट स्पीच मध्ये असे शब्द येत असतात. श्रीमती इंदिरा गांधी यांनी 6 व्या पंचवार्षिक योजनेपासून सुरू केलेल्या Sc St यांच्या विकासाचे बजेटचे आजचे वास्तव थोडक्यात मांडले. संविधान जागरचा मुद्दा महत्वाचा आहेच. संविधान हातात आणि हृदयात घेऊनच वाटचाल करावी लागणार आहे. प्रत्येक कार्यक्रमाची सुरुवात Preamble वाचनाने करावी असे सुचविले. प्रफुल गुडधे पाटील यांनी घडवून आणलेली चर्चा खूप महत्वाची ठरली. मला सुद्धा नवीन विषय व त्यांचे महत्व समजले. प्रफुल यांचे अभिनंदन. ग्रामीण भागातील विकासाच्या प्रश्नांवर सुद्धा अशी चर्चा व्हावी असेही सुचविले.

3. राजीवजी गांधी यांचे जयंती निमित्ताने जुनी आठवण शेअर केली. राजीवजी प्रधानमंत्री असताना,सप्टेंबर 1986 ला, गडचिरोली जिल्ह्यातील भामरागड तालुक्यातील Bina-gunda/kuakodi या Primitive Tribes च्या गावांना भेट देण्याबाबतचा संदेश पीएमओकडून आला होता. पावसाळ्यात या गावाना जाणे शक्य नसल्यामुळे दौरा रद्द झाला. मी माझे पुस्तक, आणखी एक पाऊल मध्ये यावर सविस्तर लिहिले आहे, ‘प्रधानमंत्री यांचा संभाव्य दौरा : टर्निंग पॉईंट’ या नावाचा लेख आहे. राजीव गांधी यांचा दौरा झाला नाही. परंतु या संभाव्य दौऱ्यामुळे आदिवासींच्या मूलभूत समस्यांकडे प्रशासनाचे लक्ष गेले आणि बदल घडला. अहेरीचा SDO/SDM म्हणून मी साक्षीदार आहे.

4. राजीव गांधी प्रधानमंत्री झाले तेव्हा त्यांनी दोन महत्वाचे उपक्रम सुरू केले होते. 1) 20 कलमी कार्यक्रमाची प्रत्यक्ष अंमलबजावणी स्वतः आदिवासी, अती दुर्गम, अती मागास भागात जाऊन पाहणे व आदिवासीशी संवाद साधणे आणि 2) जिल्हाधिकारी यांच्यासोबत झोन निहाय Responsive Administration बाबत संवाद करणे. गडचिरोली जिल्ह्यातील नक्षलग्रस्त, अतिमागास गावांना भेटीचा दौरा या हेतूने प्रस्तावित होता.

5. माझे माहितीप्रमाणे, 1986 पासून आजपर्यंत प्रधानमंत्री या भागात गेले नाहीत. 2003-04 मध्ये महाराष्ट्राचे राज्यपाल भामरागडला आले होते. दिवसभर कार्यक्रम होते. मी ZP चा सीइओ होतो. महिला बचत गटांचा मेळावा आयोजित केला होता. भामरागड तालुक्यातील महिलांसह जिल्ह्यातील जवळपास 5000 महिला सहभागी झाल्या होत्या. राज्यपाल आदिवासी मुलांशी बोलले, शाळा भेट, फॅमिली प्लॅनिंग शिबिर, विकास प्रदर्शनी, कलेक्टर, सीइओ, SP यांच्यासोबत स्वतंत्र मोकळी चर्चा, त्यानंतर डॉ. प्रकाश आमटे यांच्या हेमलकसा बिरादरी प्रकल्पाला भेट असा दिवसभर कार्यक्रम होता. डॉ. अलेक्झांडर राज्यपाल असताना त्यांनी भामरागड तालुका दत्तक घेतला होता. या दत्तक तालुक्याच्या विकासाचे काय झाले? अभ्यासाचा विषय आहे.

6. राजीवजी गांधी यांच्या या दौऱ्याबाबत दिल्लीतील काही महत्वाच्या काँग्रेस नेत्यांना 2023 मध्ये संधी मिळाली तेव्हा व त्यानंतर सांगत आलो आहे की राहुलजी गांधी यांनी या भागाचा दौरा करावा, वडिलांची अपुरी इच्छा पूर्ण करावी. भामरागड, अहेरी येथे आदिवासी व इतर सर्वांशी संवाद साधावा. ‘आदिवासीयोंकी आवाज’ व्हावे. विकासाला चालना मिळेल. आदिवासी यांच्या विकासाचा प्रश्न व त्यांच्यासाठी अजेंडा काय असावा हे ठरविण्यास हा दौरा उपयोगी ठरेल. मी, मार्च 1985 ते जुन 1989 अहेरी SDO होतो. पुन्हा 2003-04 मध्ये 16-17 महिन्यासाठी ZP चा सीइओ होतो. पूर्ण घटना माहित आहेत. असे अनेक रोमांचकारी प्रसंग आहेत. आणखी एक पाऊल, प्रशासनातले समाजशास्त्र, प्रशासनात आंबेडकरवाद आणि पत्नीवर लिहिलेले पुस्तक रेखामध्ये काही प्रसंग लिहिले आहेत.

7. आलापल्ली येथे 1988-89 मध्ये व्ही. पी. सिंगजी आले होते, नंतर PM झाले. अहेरी येथे लालकृष्ण अडवाणीजी, Dy PM असताना 2003-04 मध्ये आले होते. मी तेव्हा सीइओ होतो. भामरागडला मोठे नेते, PM, DyPM, LOP, काँग्रेस बडे नेते अजूनही आले नाहीत. माननीय प्रधानमंत्री नरेंद्र मोदीजी सुद्धा 12 वर्षात नक्षलग्रस्त भागातील आदिवासींचे प्रश्न समजून घेण्यासाठी भामरागड, अहेरी या भागात आले नाहीत. मात्र, राज्याचे मुख्यमंत्री असताना देवेंद्रजी फडणवीस या व इतर ही दुर्गम, अती मागास, नक्षलग्रस्त आदिवासी भागात अनेकदा गेले. आता तर ते या जिल्ह्याचे पालकमंत्री आहेत.

माझे मत



ई. झेड. खोब्रागडे
9923756900

8. राहुल जी गांधी LOP व काँग्रेसचे नेते आणि राजीव गांधी यांचे पुत्र म्हणून या भागात यावे, आदिवासी यांचेशी संवाद करावा. आवश्यक आहे. वडिलांची इच्छा सुद्धा पूर्ण होईल. काँग्रेस नेत्यांनी राहुल गांधी यांना सांगावे किंवा आमची भेट घालून द्यावी. म्हणजे 1986 ची घटना समजावून सांगता येईल. नागपूर जिल्ह्यातून 2005 मध्ये सुरू केलेला संविधान ओळख या उपक्रमाची माहिती देता येईल, SCP/TSP च्या बजेटचे वास्तव आमचे भूमिकेतून मांडता येईल. दिवंगत वडिलांचा अपूर्ण राहिलेला या भागाचा दौरा मुलगा राहुल किंवा मुलगी प्रियंका यांनी पूर्ण करावा असे मला वाटते. या दौऱ्याने आदिवासीच्या जीवनात थोडातरी चांगला बदल घडून येईल. राज्य सरकार कामाला लागेल. राहुलजी अनेकांना भेटतात, भामरागड भागातील आदिवासी माडिया यांनाही भेटावे. आदिवासीचे जगणे स्वतः जवळून बघावे. संविधानाने आदिवासींना खूप काही दिले आहे, ते प्रत्यक्षात मिळते का याची माहिती घेण्यासाठी व संसदेत प्रश्न मांडता यावे यासाठी सुद्धा हा दौरा आवश्यक आहे. आता तर या भागातील नक्षलवादी संपले असे सरकार सांगते. आदिवासींना प्रतिष्ठेचे जगणे प्राप्त करून देण्यासाठी प्रयत्न करणे सगळ्यांचेच कर्तव्य आहे.●●

## साद घालतो कबीर



धम्मपदात एक गाथा आहे -

**‘अभित्थरेथ कल्याणे**
**पापं चित्तं निवारये**
**दन्धं हि करोतो पुण्यं**
**पापस्मिं रमते मनो’**

सत्कर्म करण्याची घाई करा आणि मनाला पापकर्मापासून परावृत्त करा. सत्कर्म करण्यास जो विलंब करतो त्याचे मन पापकर्माकडे रमायला लागते.

संत कबीर म्हणतात -

**‘काल करे सो आज कर**
**आज करे सो अब**
**पल मे परलय होयेगी**
**बहुरि करेगा कब’**

या ठिकाणी संत कबीर देखील आम्हा सर्वांना तथागतांसारखाच अतिशय सुंदर असा संदेश देतात. आपणापैकी बरेच अमुक काम उद्याचे आहे ना तर ते उद्याला करु-अजुन वेळ आहे निवांतपणे काम करु. या अशा थाटाचे असतात. पण कबिरांना हे मान्य नाही. कारण उद्या तुमच्यावर कोणते संकट येणार हे कोणालाच माहीत नसते. उद्याचे सोडा आज काय घडणार याची जरासुद्धा कल्पना आपणाला नसते. म्हणून कबीर वेळीच लोकांना सावध करतात. कबीर घाई करण्याचा सल्ला देत नाही हे येथे लक्षात घेतले पाहिजे. तर ते आळस, टाळाटाळ आणि अजून भरपूर वेळ आहे... नंतर करुया.. अशा मानसिकतेवर प्रहार करतात. कबीर म्हणतात - बाबारे! उद्याचे काम आज कर आणि आजचे आताच कर. अरे क्षणात संकट येईल...प्रलय होईल आणि मग केव्हा करशील?●●



प्रा. वसंत वावरे
मो. 9403304670

# दिमागी नक्षल आणि नवमार्क्सवाद

> भारताचे सरन्यायाधीश सूर्यकांतनी बेरोजगार तरुणांना झुरळ संबोधल्याने कॉकरोच जनता पार्टी स्थापन झाली. तर प्रधानमंत्री नरेंद्र मोदीनी ८० वा स्वातंत्र्यदिनी लाल किल्ल्यावरून ‘दिमागी नक्षल’ म्हणताच दिमागी नक्षल पार्टी स्थापन होऊन त्यांचे २ लाख ४० हजार सभासद झाले. परजीवी आंदोलनजीवी नंतर दिमागी नक्षली म्हणजेच वैचारिक नक्षलवादी म्हणजे माओवादी या सशस्त्र नक्षलवाद संपला असला तरी नक्षली मानसिकता असणारे 'दिमागी नक्षल ' नवीन धोका समाजात अराजकता पसरवण्याची संधी शोधत आहे. अशा लोकांना ओळखून त्यांना समाजात वेगळे पाडले पाहिजे. कारण जिथे एकेकाळी बंदुकीच्या गोळ्यांचा आवाज यायचा, तिथे आता विकासाचा तिरंगा अभिमानाने फडकत आहे. तर मग दिमागी नक्षली कोण?



केंद्रीय मंत्री किरन रिजिजूनी स्पष्ट केले की, जे भारतीय संविधानाचा स्वीकार करत नाहीत. जे फुटीरतावादी शक्तींच्या पाठीशी उभे राहतात आणि कलम ३७० चे समर्थन करतात. ज्यांना ईशान्य भारताला देशापासून वेगळे करण्यासाठी 'चिकन नेक' म्हणजे सिलिगरी कॉरिडॉर तोडण्याची भाषा करायची असते. परंतु नक्षलवाद कोठून सुरू झाला तर बंगालमधील दार्जिलिंग जिल्ह्यातील 'नक्षलबाडी' गावात १९६७ साली गरीब शेतकरी, आदिवासी आणि मजूर यांच्यावरील अन्यायाचा बदला घेण्यासाठी आणि सरकारविरुद्ध हिंसक लढा देण्यासाठी चारू मजुमदार आणि कानू सन्याल यांनी उठाव केला. त्याला नक्षलबाडी गावावरून 'नक्षलवाद' नाव पडले.

छत्तीसगड, झारखंड आणि महाराष्ट्रात गडचिरोली सारख्या दुर्गम व घनदाट जंगलांच्या भागात नक्षलवादी चळवळीचा प्रभाव राहिला. चिनी नेते 'माओ त्से-तुंग' यांच्या साम्यवादी विचारसरणीवर आधारित डाव्या विचारसरणीची, सशस्त्र चळवळ हिला 'माओवादी' म्हणतात. जमिनी हक्क आणि जंगल उत्पादन यावरून आदिवासी व गरिबांची आर्थिक आणि सामाजिक पिळवणूक. सुरू असताना मूलभूत सुविधा गरिबांपर्यंत पोहोचत नव्हत्या. सुरवातीला ही चळवळ आदिवासींच्या हक्कासाठी व शोषणाविरुद्ध उभी राहिलो. असली तरी पोलीस आणि नक्षलवादी यांच्यातील संघर्षात निष्पाप आदिवासींचा बळी गेले.

नक्षलवाद वर बरेच सिनेमा आले. पण आदिवासींसाठी वरदान की शाप? यावर विचारमंथन केल्याशिवाय दिमागी नक्षल कळणार नाही. कारण नक्षलवादी बाजूला पडून आता भांडवलदारांचा जमीन, जल आणि जंगलवर डोळा असल्याचे आदिवासी आरोप करीत आहेत.

दिमागी नक्षलच्या अगोदर अभिजित जोगचे “जगाला पोखरणारी डावी वाळवी” हे पुस्तक आंबेडकरवाद्यांनी समजून घेण्याची गरज आहे. कारण डॉ. बाबासाहेब यांच्या “शिका, संघटीत व्हा आणि संघर्ष करा”मध्ये शिका या मार्गदर्शक तत्वाकडे बगल देऊन या पुस्तकांकडे दुर्लक्ष करण्यास समाज विचारप्रवाहाच्या मार्गात अडथळा निर्माण होईल. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी इस्लाम, ख्रिश्चनिटी, कमुनिझम, बौद्ध मत, जैन मत, शीख संप्रदाय आधी साऱ्या विचारधारांचा सखोल अभ्यास करून शेवटी या मातीचा सुगंध असणारे बौद्ध मत स्वीकारले. कम्युनिझमचा पर्याय ठोकरून लावणाऱ्या भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांशी सुसंगत “जगाला पोखरणारी डावी वाळवी” हे पुस्तक आंबेडकरवाद विरोधी म्हणजे बंदुकीच्या नळीतून येणारी रक्तरंजित क्रांती अशक्य आहे हे ओळखून डाव्या शक्तींनी जागतिक वर्चस्वाचे आपले स्वप्न पूर्ण करण्यासाठी एक नवी घातक रणनीती आखली, जिचे उद्दिष्ट होते पाश्चात्य जगताची कुटुंबव्यवस्था, धर्मसंस्था, देशप्रेम यासारखी शक्तिस्थान आतून पोखरून टाकत त्यांचा विध्वंस करणे. यासाठी त्यांनी अतिरेकी व्यक्तिवाद, विकृत स्वरूपातील स्त्रीवाद, लैंगिक स्वैराचार, समलैंगिकतेचा प्रसार, इतिहासाचे विकृतीकरण, धर्म आणि संस्कृतीची कुचेष्टा, अनिर्बंध स्थलांतराला प्रोत्साहन... यांचा आधार घेत कुटुंब, समाज, राष्ट्र यांना स्वयंविध्वंसाच्या टोकावर आणून उभे केले.



आनंद म्हस्के
मो. 8652325032

मार्क्सवादातील श्रीमंत विरुद्ध गरीब हा मूळ आर्थिक संघर्ष दूर ठेऊन वंश, लिंग, धर्म या सांस्कृतिक आधारांवर विविध गटांमध्ये सतत संघर्ष भडकत राहील अशी योजना राबवली. विशेष म्हणजे आपला विध्वंसक अजेंडा राबवण्यासाठी सामाजिक न्याय, पर्यावरणवाद, स्त्रीमुक्ती, सर्वसमावेशकता हे आकर्षक मुखवटे धारण केल्यामुळे त्यांना विरोध करणेच अशक्य ठरू लागले. या नवमार्क्सवादाने आता भारताकडे लक्ष वळवले आहे. मूळ मार्क्सवादाच्या समोर दिसणाऱ्या बंदुकीशी लढणे शक्य होते पण आपल्याच लोकांचा बुद्धिभेद करून आतून पोखरणाऱ्या या वाळवीला आवरणे फारच कठीण आहे. म्हणून इतरांच्या अनुभवावरून आजच जागे व्हायला हवे. आकर्षक मुखवट्यांमागचा हा भेसूर, विध्वंसक चेहरा वेळीच ओळखायला हवा.●●

# कुणाल आणि कुटुंबाची दु :खद घटना

## मानसिक आरोग्य आणि कौटुंबिक विसंवादाचा गंभीर धडा



खवड्या डोंगरावरील ही शोकांतिका : समाजाला मानसिक आरोग्याचा गंभीर इशारा देत आहे.कुणाल मुरलीधर चांदगुडे, त्यांचे वडील मुरलीधर आणि आई संगीता यांच्या घटनेवर मानसिक आरोग्याच्या दृष्टिकोनातून आपण या लेखात चर्चा करणार आहोत. छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील खवड्या डोंगरावर घडलेली ही घटना अत्यंत दुःखद आहे. सुमारे १८-१९ वर्षीय कुणाल, त्यांचे वडील मुरलीधर (४८) आणि आई संगीता (४२) या तिघांचा मृत्यू झाला. सुरुवातीला मोबाइल,आयफोनच्या हप्त्यासंबंधी वाद हे कारण सांगितले गेले, पण तपास आणि कौटुंबिक पार्श्वभूमीवरून असे दिसते की ही केवळ क्षणिक भांडणाची घटना नव्हती. मागील वर्षीही कुणालने त्याच ठिकाणी आत्महत्या करण्याचा प्रयत्न केला होता, घरात मोठ्या भावाला आजाराने गमावल्यानंतरचा दुःख, वडील-मुलातील दुरावा, पित्याचे दीर्घकाळ घराबाहेर राहणे आणि संभाव्य कौटुंबिक तणाव यांचा प्रभाव दिसतो. ही घटना मानसिक आरोग्याच्या दृष्टीने गंभीर इशारा देते. किशोरवयीन मानसिक आरोग्य आणि आवेगपूर्ण निर्णय किशोरवयीन काळात मेंदूचा भावनिक नियंत्रण करणारा भाग पूर्ण विकसित झालेला नसतो. तणाव, नकार, अपमान किंवा “कोणी ऐकत नाही” ही भावना तीव्र स्वरूपात जाणवते. कुणालने डोंगराच्या कड्यावर तासनतास उभे राहून “मला कोणी ऐकत नाही, जगण्यात रस नाही, उपाय नाही” असे म्हटले असल्याचे समोर आले आहे. हे निराशा, हताशा आणि आत्मघातकी विचारांचे स्पष्ट संकेत होते. मागील प्रयत्न यशस्वीपणे रोखला गेला असतानाही त्यानंतर व्यावसायिक मानसिक आरोग्य मदत मिळाली का, हे महत्त्वाचे आहे. एकदा आत्महत्या प्रयत्न झाला की पुन्हा होण्याचा धोका वाढतो. भौतिक वस्तू (फोन) ही फक्त बाह्य ट्रिगर असू शकते; खरे कारण दीर्घकाळ चाललेला भावनिक ताण, कौटुंबिक संघर्ष किंवा न सोडवलेले दुःख असू शकते. पोलीसही प्राथमिक तपासात आयफोन एकमेव कारण नसल्याचे सांगत आहेत आणि मानसिक तणावाचा उल्लेख करत आहेत.

**कौटुंबिक गतिशीलता आणि न सोडवलेले दुःख :** कुटुंबात मोठ्या मुलाच्या मृत्यूनंतर तणाव वाढल्याचे उल्लेख आहेत. वडील ट्रक चालक असल्याने दीर्घकाळ घराबाहेर राहत, त्यामुळे भावनिक जोडणी कमकुवत होऊ शकते. पितृकुटुंब आणि आई-मुलातील दुरावा, तसेच मृत्यूनंतरही अंत्यसंस्कार वेगवेगळ्या ठिकाणी झाले हे दाखवते की संबंधांतील भेदांचे परिणाम खोल जाते . अशा वातावरणात मुलाला सुरक्षित आधार मिळत नाही. त्याचे “कोणी ऐकत नाही” असे अनुभवतो. आई संगीता यांनी घटनापूर्वी सोशल मीडियावर कौटुंबिक दुराव्याबद्दल भावनिक व्हिडिओ शेअर केले होते, असे अहवाल आहेत. हे सूचित करते की घरात दीर्घकाळ चाललेला तणाव आणि कदाचित वैवाहिक किंवा नातेसंबंधातील समस्या होत्या. मुलासमोर पालकांमधील संघर्ष, दुरावा किंवा आर्थिक तणाव थेट मुलाच्या मानसिक आरोग्यावर परिणाम करतो. मुलगा स्वतःला “समस्या” किंवा “ओझे” समजू लागतो. आई-वडिलांची प्रतिक्रिया आणि आघात वडील मुलाला वाचवण्यासाठी पुढे गेले वडिलांनी त्याला पकडू नये म्हणून मुलगा मागे सरकला आणि दोघे दरी मध्ये पडले. हे पाहून आईनेही उडी घेतली. हे तीव्र भावनिक आघात (acute trauma) आणि तीव्र दुःखाचे उदाहरण आहे. एखाद्या प्रिय व्यक्तीला मृत्यूच्या उंबरठ्यावर पाहणे हे मेंदूसाठी असह्य असू शकते. काही व्यक्तींमध्ये “मीही जाईन” ही आवेगपूर्ण प्रतिक्रिया येते, विशेषतः जेव्हा आधीच कौटुंबिक तणाव आणि एकाकीपणा असतो. आईची ही कृती “प्रेमाचा अतिरेक” नव्हे, तर अत्यंत तीव्र भावनिक वेदनेची प्रतिक्रिया होती.

मनःस्वास्थ्याचा प्रवास



प्रवीण गांगुर्डे
मो. 9890631933

**समाज आणि पालकांसाठी धडे लवकर ओळखा :** “मला कोणी ऐकत नाही”, सतत राग, एकाकीपणा, झोपेतील बदल, अभ्यासात घसरण, मागील आत्महत्या प्रयत्न – हे लाल झेंडे आहेत. त्यांना गांभीर्याने घ्या. संवाद महत्त्वाचाः भांडण होताच “जा” किंवा “काय करशील?” असे म्हणण्याऐवजी शांत राहून ऐका. “तुझे दुःख मला कळते, आपण सोबत उपाय शोधू” असे सांगा.

**व्यावसायिक मदत :** किशोरवयीन मुलांना समुपदेशन, कौटुंबिक थेरपी उपलब्ध आहे. मानसिक आरोग्य तज्ञ तात्काळ मदत देऊन पुढील उपचार करू शकतात,लज्जा किंवा “आपल्या घरात असे होत नाही” ही भावना बाजूला ठेवा.

**भौतिक अपेक्षा आणि दबाव :** महागड्या वस्तूंसाठी हट्ट आणि आर्थिक असमर्थता एकत्र आली की संघर्ष तीव्र होतो. मुलांना मूल्ये, भावनिक बळ आणि वास्तववादी अपेक्षा शिकवणे आवश्यक.

**पालकांचेही आरोग्य :** पिता दीर्घकाळ बाहेर, आई एकटी तणाव सहन करत असेल तर त्यांनाही आधार हवा. न सोडवलेले दुःख (मोठ्या मुलाचा मृत्यू) पिढ्यानपिढ्या परिणाम करते. ही घटना फक्त एका कुटुंबाची नाही. ती आपल्याला सांगते की मानसिक आरोग्य ही वैयक्तिक बाब नाही – ती कौटुंबिक आणि सामाजिक आहे. उशिरा हस्तक्षेप केल्यास परिणाम अपरिवर्तनीय होतात. जर तुम्ही किंवा तुमच्या ओळखीच्या कोणाला निराशा, हताशा किंवा आत्मघातकी विचार येत असतील तर ताबडतोब मानसिक आरोग्य तज्ञानची मदत घ्या.

**मदतीसाठी :** भारतात ,मनोविकारतज्ञ, मानसोपचारतज्ञ, मानसशास्त्रज्ञ, मानसिकआरोग्यतज्ञ , समुपदेशक किंवा स्थानिक मानसिक आरोग्य हॉटलाइनवर संपर्क साधा. कोणत्याही वयात, कोणत्याही परिस्थितीत मदत घेणे ही शक्तीची खूण आहे, कमजोरीची नाही. ही शोकांतिका आपल्याला आठवण करून देते – वेळेवर ऐकणे, समजून घेणे आणि व्यावसायिक मदत घेणे जीव वाचवू शकते.आपल्या आजूबाजूच्या मुलांची मोठ्यांची लक्षणे ओळखा आणि तात्काळ मानसिक प्रथमोपचार देऊन पुढील उपचारासाठी मानसिकआरोग्यतज्ञानची मदत घेऊन आत्महत्या रोकता येऊ शकतात आणि जीव वाचवला जाऊ शकतो.●●

“ चांगले विचार मनात ठेवले की जीवन आपोआप सुंदर वाटते... ”

बहुजन सौरभ
BAHUJAN SAURABHA



# भारतातील जातीयतेचे बदलते स्वरूप

भारतात जात ही संकल्पना सर्वव्यापी समाज व्यवस्था आहे. जात ही श्रमाचेच नव्हे तर श्रमिकांचे विभाजन करते. त्यामुळे येथे माणसाची ओळख त्याच्या कर्तृत्वानुसार ठरत नसून त्याच्या जातीनुसार ठरत असते. विषमतेला जोपासणारी जात ही कधी जातच नाही. जात-जातीयता ही मनुस्मृतीची देन असून एका विशिष्ट वर्गाला विशेषाधिकार मिळवून देते. येथील धर्मग्रंथांनी जात माणसामाणसात रुजवली आहे. सत्तेच्या समीकरणासाठी जात महत्वाचा घटक मानला जातो. संविधानिक कायद्यामुळे १९५० नंतर जातीयता वरवर नष्ट झाल्याचे दिसून येते. पण मुळात तिचे स्वरूप ‘जैसे थे’च आहे. जातीयतेचे स्वरूप बदलले असून अनुसूचित जातीच्या आरक्षणाचा विरोध, उपवर्गीकरण, क्रिमीलेअर या घटना जातेयतेला दृढ करणाऱ्या आहेत. व्यक्ती कर्तृत्वाने कितीही श्रेष्ठ असला तरी जातीभेद त्याचा आजन्म पाठपुरावा करते. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अत्यंत क्रूर, अमानुष जातीयतेचे चटके सोसावे लागले. त्यांच्या बालपणीचा गाडीवानचा प्रसंग, शाळेतील दप्तर आणि पाटीचा विटाळ, बडोद्यातील पारशी धर्मशाळेतील (सराई) प्रसंग, अशा कितीतरी घटना आजही अंगावर शहारे आणणाऱ्या आहेत. डॉ. बाबासाहेबांनी आपल्या शालेय जीवनातच पाण्याला स्पर्श करण्याची बंदी अनुभवली. त्यामुळे त्यांनी २० मार्च १९२७ रोजी महाड येथे पिण्याच्या पाण्यासाठी सत्याग्रह घडवून आणला. अस्पृश्यांच्या पाणी स्पर्शाने चवदार तळे अपवित्र, विटाळले गेले. त्यामुळे सनातनी ब्राह्मणांनी तळ्याचे पंचगव्याने शुद्धीकरण केले. माणसाच्या स्पर्शाने तळे विटाळते पण जनावराच्या शेणामुत्राने ते शुद्ध होते, ही वागणूक मानवाधिकार विरोधी आहे, तशीच ती डॉ. बाबासाहेब आणि दलित समाजासाठी अत्यंत क्लेशदायी होती. या घटनेच्या निषेधार्थ डॉ. बाबासाहेबांनी २५ डिसेंबर १९२७ रोजी जाहीरपणे मनुस्मृतीचे दहन केले. देशात संविधान लागू झाले. भारतीय संविधानामुळे शतकानुशतके शोषित, उपेक्षित समाज घटकांना समान हक्क व प्रतिष्ठेने जगण्याचे कायदेशीर अधिकार मिळाले. आरक्षणाने ते संरक्षित झाले. परिणामी ते मोठमोठे अधिकारी, डॉक्टर्स, प्राध्यापक, सांसद, मंत्री, राष्ट्रपती बनू शकले. असे असले तरी त्यांना आजही जातीयतेचे चटके सहन करावे लागत आहे. २४ जानेवारी १९७८ रोजी वाराणशी येथे तत्कालीन मुख्यमंत्री संपूर्णानंद यांच्या पुतळ्याचे अनावरण माजी उपप्रधानमंत्री बाबू जगजीवन राम यांनी केले होते. जगजीवन राम हे दलित नेते होते म्हणून सनातन्यांनी पुतळ्याचे गंगाजलाने शुद्धीकरण केले. माजी राष्ट्रपती रामनाथ कोविंद मार्च २०१८ मध्ये जगन्नाथ मंदिराच्या दर्शनासाठी गेले असता त्यांना जातीय भेदभावाचा सामना करावा लागला. काही पुजाऱ्यांनी त्यांना गर्भगृहात जाण्यापासून प्रतिबंधित केले. रोहित वेमुला आणि पायल तडवी यांच्या आत्महत्त्येस




जातीयता कारणीभूत होती. २२ जानेवारी २०२४ रोजी राम मंदिरातील रामाची प्राणप्रतिष्ठा प्रधानमंत्री मोदी यांच्या हस्ते झाली. परंतु आदिवासी महिला राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू या पुजेस उपस्थित नव्हत्या. ही सरकारी स्तरावर जातीयवादी मानसिकतेची उदाहरणे आहेत. देशाच्या सर्वोच्च पदावर असणाऱ्या व्यक्तीविषयी जातीवादी वागणूक असेल तर सामान्य मागासवर्गीयांना कशी वागणूक दिली जात असेल, याची कल्पना येते. ८ ऑगस्ट २०२६ रोजी उत्तराखंडमधील हल्द्वानी येथे काँग्रेस अध्यक्ष आणि विरोधी पक्षनेते मल्लिकार्जुन खरगे यांची भव्य सभा झाली. संसदेत बोलतांना मल्लिकार्जुन खरगे म्हणतात, मी माझ्या भाषणात कोणत्या ही जातीधर्माचा उल्लेख केला नाही. देशातील बेरोजगारी, महागाई, शिक्षणातील भ्रष्टाचार या सारख्या समस्यांवर मी भाषण दिले. देशासमोरील विविध आव्हाने आणि समस्या जनतेसमोर मांडल्या. परंतु १० ऑगस्ट २०२६ रोजी त्याच सभामंच आणि जागेचे जातीवादी संघटनांनी हवन करून गंगाजलाने ‘शुद्धीकरण’ केले. संपूर्ण मैदानावर गोमूत्र शिंपडले. समाज माध्यमांवर शिवीगाळ करून ट्रोल केले. शुद्धीकरण करणाऱ्यांवर अस्पृश्यता प्रतिबंधक कायद्यांतर्गत गुन्हे दाखल करून अटक करावी अशी खरगे यांनी संसदेत मागणी केली. या घटनेची दखल पोलिस, प्रशासनाने वेळेत घेतली नव्हती हे विशेष. या प्रकारामुळे संसदेपासून संपूर्ण देशात मोठा वाद निर्माण झाला. काँग्रेसने



श्रीराम बनसोड,
8208617748

या घटनेला मागासवर्गीय समाज आणि संविधानाचा अपमान मानत देशभरात तीव्र निषेध नोंदवला. या घटनेच्या निषेधार्थ देशातील अनेक शहरात काँग्रेसच्या कार्यकर्त्यांनी निदर्शने केली आणि संबंधित गुन्हेगारांवर कायदेशीर कार्यवाही करण्याची मागणी केली. सत्ताधारी नेत्यांनी (नेहमीप्रमाणे) या प्रकरणाची चौकशी करण्याचे आश्वासन दिले. वास्तविक हा अपमान केवळ खरगे यांचा नसून संविधानाचा, संपूर्ण देशाचा आहे. मागील १२ वर्षात भारतातील जातीयतेचे स्वरूप कमालीचे बदलले आहे. जातीभेदास कायदेशीर संरक्षण असले तरी मागासवर्गीयांशी होत असलेल्या अत्याचारात वाढ झाल्याचे आकडे प्रकाशित झाले आहे. आरक्षणाच्या स्पर्धात्मक लढाईत जातीयतेचे स्वरूप अधिक व्यापक झाले आहे. मागासवर्गीयांनी प्रगती करू नये यासाठी पेपर फुटीचे प्रकार घडत आहे. आज तांत्रिक शिक्षणाचा विस्तार झाला खरा. परंतु फेसबुक, इंस्टाग्राम, युट्यूबवर जातीयतेचे रिल्स बनविल्या जात आहे. त्याद्वारे नकळत नवीन पिढीत जातीयतेच्या भिंती अधिक मजबूत होत आहे. ८ ऑगस्ट २०२६ रोजी मल्लिकार्जुन खरगे यांच्या विषयी घडलेल्या घटनेचा धम्मसंगोष्टी, दै. बहुजन सौरभ, वंदना संघ, बहुजन मैत्री संघ, बुद्ध विहार समन्वय समिती, समता सैनिक दल, सम्यक संकल्प संघ यासारख्या विविध संघटनांनी निषेध नोंदवला आहे. एकंदरीत, हा सत्तेच्या हुकुमशाही विरुद्धचा निषेध आहे. “चेहऱ्यावरचे मुखवटे तुमचे आता फाडलेच पाहिजे, जातीवादी कृत्यांचा जाहीर निषेध केलाच पाहिजे.●●

## प्रकृती

अनंतायन



ॲड. अनंत खेळकर
मो. 9370061677

माणूस कितीही गोड आणि छान बोलत असला , खुप सुंदर विचार प्रकट करत असला तरी जोपर्यंत तो आपल्या आचरणातून आपल्या व्यवहारातून याची प्रचिती देत नाही तोपर्यंत या गोष्टींना काहीच अर्थ उरत नाही. नाते टिकावे म्हणून खुप बोलावे लागते असे मुळीच नाही. सर्व प्रकारच्या नात्यामध्ये ते नाते सर्वोत्तम मानले जाते ज्या नात्यात शब्द भलेही कमी असतील पण विश्वास मात्र भरपूर असतो. दिखावा नसून मनापासून प्रेम असते. माणसाने हा विचार करावा की, आपण कुणाचेही भाग्य बदलू शकत नाही म्हणून बिघडले तरी कुठे? आपण समोरच्याला, प्रेरणा, प्रोत्साहनासोबत आपल्या जवळ असलेले ज्ञान, अनुभव यावरून योग्य ते मार्गदर्शन तर नक्कीच करू शकतो. मानवाचे आयुष्य पारदर्शक नसल्याने हा सर्व तिढा निर्माण झाला आहे. म्हणूनच माणूस नैसर्गिक प्रकृतीकडे वळतो. त्याला प्रकृतीच्या सानिध्यात परत जाणे आवडते. कारण निसर्गात बनावट असे काहीही नसते, जे काही आहे ते अस्सल. झाड न मागताही फुले, फळे, पाने देते. त्याचा मोबदलाही मागत नाही. झाड कुऱ्हाड मारणाऱ्यालाही सावली देते. कोणताही भेदभाव न करता नदी वाहते. जो जवळ आला त्याची आपल्या पाण्याने तहान भागवते. आकाशातील ढग, पावसाच्या सरी कधीही गरीब, श्रीमंत, जात , धर्म, भाषा आणि चेहरा बघुन बरसत नाहीत. त्यांच्या नजरेत सर्वजण समान असतात. ‘प्रकृति बिना स्वार्थ के, सब पर प्यार लुटाती है, बग़ैर कुछ मतलब के नदीयाँ सब की प्यास मिटाती है । पेड़ अपने फलों को, कहाँ खुद खाते हैं, जो मारता है कुल्हाड़ी, उसे भी छाया देते हैं सूरज हर रोज़ उजालों का दान देता है, चाँद अंधेरों में भी सुकून की पहचान देता है, हवा बिना भेदभाव के साँसें दे जाती है, प्रकृति यही सब बातें इंसान में कहाँ नज़र आती हैं ’ ●●

# कौटुंबिक सुसंवाद हरवल्याने

## वैचारिक मतभिन्नतेतून घडतात दुर्दैवी घटना



जन्मास येणाऱ्या प्रत्येक मानवी जीवाला हे जग दाखविणारे आईबापच असतात, जे जन्मापासून मृत्यूपर्यंत आपल्या चिल्यापिल्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे असतात त्यांचा आधार बनून. रात्रंदिवस कुटूंबियांच्या जबाबदारीचे ओझे डोक्यावर घेऊन मुलांच्या भविष्यासाठी भ्रमंती करणारा बाप कधी कुणाला अंतर्मनातील दुःख दिसू देत नाही. ऊन, पाऊस, वादळ, वाऱ्याची तमा न बाळगता धडपडणारा बापमाणूस कुटूंबावर आकस्मिक येणारे आणि उद्‌भवणारे व क्षणिक उफाळून येणारे गंभीर स्वरूपाचे हेलकावे धिरोदात्तपणे परतून लावत त्याची झळ घराच्या वसरीपर्यंतही बसू देत नाही. तर दुसरीकडे मुलाबाळांचे खानपान, राहणीमान, आरोग्य आणि शिक्षण यावर लक्ष पुरवून कुटुंबातील सर्व लहान मोठ्यांची काळजीवाहक म्हणून काम करणारी आणि प्रसंगी स्वतः उपाशी राहून इतरांना घास भरवणारी व्यक्ती म्हणजे अर्थातच माय, मम्मी, मदर, आई. सोबतच कुटुंबियांची सर्वपरीने जबाबदारी पेलण्यासाठी समर्थ असलेला बाप कधी कधी कौंटुबिक आपसी कलहाने खचून जात असला तरी, त्यातून तो स्वतःला सावरून लगेच आव्हानाला सामोरे जाऊन धैर्याने आपत्कालिन प्रसंगाला तोंड देत पुढे जातो, तो सुद्धा बापच असतो. बाप गरीब असो की श्रीमंत मात्र त्याची आपल्या मुलाबाळांविषयी धडपड ही कायम सारखीच असते, त्यात फरक असतो केवळ आर्थिक कुवतीचा. बापाचे अंतर्मन हे अत्यंत लवचिक आणि प्रेमाने ओतप्रोत भरलेले असले तरी बापाच्या मनाचा खरा ठाव कधीच कुटूंबियांना घेता येत नाही, त्या बहाद्दर हिम्मतवाल्या कर्तबगार माणसाचे दुसरे नाव म्हणजे अर्थातच बाप, डॅडी, फादर. मागे वळून भारतीय संस्कृतीचे अवलोकन केले असता दिसून येते की, येथील रूढी, परंपरांनी पुरूषांना पुरूषप्रधान म्हणून जे कौंटुबिक वर्चस्व बहाल केले आणि त्यातूनच कुटुंब प्रमुख म्हणून बापमाणूस अविरतपणे आपल्या कुटूंबियांसाठी राबतांना मानापमानाची पर्वा न करता मार्गक्रमण करीत कुटूंबाचा गाढा हाकत असतांना अनेकदा तो आकस्मिक घडणाऱ्या घटनांनी दुःखी व विचलीत होतो आणि वेदनांनी त्याचे अंतर्मन जळत असले तरी, त्या जळण्याची आस कुटुंबातील इतर सदस्यांना लागणार नाही याची जाणीवपुर्वक पुरेपूर दक्षता बापमाणूस घेतच असतो. अनेकदा काही बाबतीत प्रयत्न करून सुद्धा त्याला अपयशाला सामोरे जावे लागते, त्यामुळे तो काही कालावधीसाठी निराश आणि हतबल होत असला तरी कोणत्याही अपयशाचे खापर तो इतरांवर न फोडता प्रत्येक समस्येचे निराकरण शोधण्याचा प्रयत्न करतो. साहजिकच बापमाणूस आनंददायी घटनांचे शिलेदार कुटूंबातील सदस्यांना मानत असला तरी, आकस्मिक घडणाऱ्या दुःखद घटनांसाठी तो कुणालाही दोष न देता त्याची सर्वस्वी जबाबदारी कुटुंब प्रमुख म्हणून आपल्या खांद्यावर घेतो. आज मात्र विज्ञान, माहिती आणि तंत्रज्ञानाच्या माध्यमातून माणसाने आपल्या बुद्धीच्या जोरावर विकासाच्या दिशेने आकाशाला गवसणी घातली असली तरी, त्याचे मानसिक समाधान होतांना दिसत नाही. त्यामुळे तो अधाशाप्रमाणे आहे त्यापेक्षा अधिक वेगळे काही मिळवण्याच्या मागे लागतो, त्यामुळे निश्चितच कुटुंबात एकत्र बसून सुसंवाद साधायला कुणाला वेळ मिळत नाही आणि हिच महत्वपूर्ण बाब कुटूंबातील वैचारिक कलहाला कारणीभूत ठरत असते, ज्यामधून मतभिन्नता व विरोधाभास वाढीस लागते आणि प्रसंगी त्याचा विस्फोट होऊन कल्पनेच्या पलीकडच्या दुर्दैवी घटना घडतात, हे सुधारलेल्या समाजाचे दुर्दैवच म्हणावे लागेल. अशीच काहीशी संपूर्ण देशाला चटका देणारी, मन हेलावून टाकणारी दुर्दैवी घटना महाराष्ट्र राज्यातील संभाजी नगर जिल्ह्यातील वाळूज येथील खवड्या डोंगरावर शुक्रवार दि.२१ ऑगस्ट २६ रोजी घडली. त्यामध्ये १९ वर्षीय मुलगा कुणाल मुरलीधर चांदगुडे, वडील मुरलीधर दामोधर चांदगुडे वय-४८ वर्ष आणि आई संगीता मुरलीधर चांदगुडे वय -४२ वर्ष, रा. अक्षयबन सोसायटीसमोर झाल्टा फाटा ता. छत्रपती संभाजी नगर, मूळ रा. कर्जत पिंपळगाव, ता. अंबड जि. जालना असे डोंगरावरून दरीत पडून मृत्यू झालेल्यांची नावे आहेत. या दुर्दैवी घटनेने एक चालता बोलता संसार क्षणात उद्धवस्त झाला. ज्यामुळे महाराष्ट्रासह देशभरातील समाजमन सुन्न झाले आणि विविध विचारांच्या चर्चेने ढवळून निघाले. झालेल्या दुर्दैवी घटनेनंतर असे का घडले याबाबत जनमनात अनेक तर्कवितर्क लावण्यात येत असले तरी जीवनाचा नाहक शेवट करून घेण्यापेक्षा इनमीन तीन असलेल्या बाप, आई आणि शिक्षित मुलाने उद्‌भवलेल्या अडचणींवर अथवा समस्येवर एकत्र बसून सुसंवाद साधला असता तर कदाचित त्यांच्या मानसिकतेत बदल होऊन ही कौंटुबिक दुर्घटना टाळता आली असती. जेथे जन्म आहे तेथे मृत्यू अटळ आहे, असे तथागत भगवान गौतम बुद्ध यांनी आपल्या वाणीतून सत्य जगाला सांगितले आहे. त्यामुळे मिळालेला जीवनकाल आनंदाने घालवून शेवटी मृत्युला सामोरे जाणे यालाच जीवन म्हणतात. एकदिवस सर्वांनाच हे जग सोडून जावे लागत असले तरी, त्यावर आत्महत्या करून मधातच अमुल्य असे जीवन संपवणे अत्यंत क्लेशदायक आहे. चांदगुडे कुटुंबातील तीनही जीव आज जगात नसतांना त्यांच्या आत्महत्येला प्रभावीत करणाऱ्या तथा जबाबदार असणाऱ्या विविध कंगुऱ्यांची चर्चा होतांना दिसते, जी जर तरच्या प्रश्न आणि उत्तरात निरूत्तर ठरते आहे. म्हणूनच धावत्या धावपळीच्या जीवनात पुढील कौंटुबिक अनर्थ टाळण्यासाठी सुसंवाद हाच एकमेव पर्याय माणसांनी जीवन जगतांना अंगिकारणे गरजेचे असून, कोणत्याही निरर्थक वादापेक्षा अमुल्य असे मिळालेले जीवन आनंदाने घालविणे यापेक्षा दुसरा कोणताही सुखाचा मार्ग अस्तित्वात नाही. एवढे मात्र निश्चित!●●



रतन तायडे
94201 25761

# मुंबईच्या अभ्यासकांची सिंधुदुर्गात दोन दिवसांची अभ्यासपूर्ण भटकंती

वेंगुर्ला, मालवण, कुडाळ व सावंतवाडी तालुक्यांतील ऐतिहासिक व सांस्कृतिक वारसास्थळांचा प्रत्यक्ष अभ्यास; मंदिरे, चर्च, किल्ले, बंदरे, जुन्या शाळा, लेणी व बौद्ध विहारांना भेट.




**सिंधुदुर्ग :** महाराष्ट्रातील प्राचीन लेणी, ऐतिहासिक वास्तू आणि सांस्कृतिक वारशाचा अभ्यास करून त्याचा प्रचार-प्रसार करणारे मुंबईतील ‘लेणी संवाद’चे प्रमुख प्रफुल्ल पुरळकर आणि ‘एकजूट लेणी अभ्यास प्रचार प्रसार समूह, महाराष्ट्र राज्य’चे प्रमुख सारीश डोळस यांनी सिंधुदुर्ग जिल्ह्यात दोन दिवसांची अभ्यासपूर्ण भटकंती केली. या दौऱ्यात त्यांनी वेंगुर्ला, मालवण, कुडाळ आणि सावंतवाडी तालुक्यांतील विविध ऐतिहासिक, धार्मिक, सामाजिक व सांस्कृतिक वारसास्थळांना प्रत्यक्ष भेट देऊन त्यांचा अभ्यास केला. या दोन दिवसांत अनेक मंदिरे, चर्च, प्राचीन बंदरे, डच वखार, जुन्या शाळा, कोरजाई येथील लेणी-मंदिर, निवती व भरतगड किल्ले तसेच मालवण राजकोट येथील छत्रपती शिवाजी महाराज स्मारक आदी महत्त्वपूर्ण स्थळांना त्यांनी भेट दिली. सिंधुदुर्गच्या बौद्ध आणि सामाजिक वारशाचाही या भटकंतीत विशेष अभ्यास करण्यात आला. म्हापण येथील नालंदा बुद्ध विहार, वेरळ येथील प्रज्ञा बुद्ध विहार आणि निरवडे येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक यांना भेट देऊन स्थानिक इतिहास, सामाजिक-सांस्कृतिक परंपरा आणि वारसा जतनाच्या विविध पैलूंची माहिती त्यांनी जाणून घेतली. पुरळकर आणि डोळस हे महाराष्ट्रातील विविध जिल्ह्यांमधील लेणी, किल्ले, प्राचीन वास्तू आणि वारसास्थळांना नियमित भेटी देऊन त्यांचा अभ्यास करीत आहेत. प्रत्यक्ष स्थळभेटी, उपलब्ध ऐतिहासिक साधने आणि स्थानिकांकडून मिळणारी माहिती यांच्या आधारे या वारशाची ओळख सर्वसामान्यांपर्यंत पोहोचविण्याचे काम ते सातत्याने करत आहेत. सिंधुदुर्गातील प्रसिद्ध पर्यटनस्थळांबरोबरच दुर्लक्षित आणि अपरिचित वारसास्थळांचा शोध घेणे, त्यांचे ऐतिहासिक महत्त्व समजून घेणे आणि या स्थळांच्या अभ्यासाला चालना देणे, हा या दोन दिवसीय दौऱ्याचा प्रमुख उद्देश होता. त्यामुळे ही भटकंती केवळ पर्यटनापुरती मर्यादित न राहता अभ्यास, निरीक्षण आणि वारसा संवर्धनाच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण ठरली. या अभ्यासदौऱ्यासाठी कणकवलीचे डॉ. चंद्रकांत पुरळकर आणि म्हापणचे उपासक चंद्रकांत म्हापणकर यांचे विशेष सहकार्य लाभले. त्यांच्या स्थानिक मार्गदर्शनामुळे विविध वारसास्थळांची माहिती जाणून घेणे आणि त्यांचा अभ्यास करणे अधिक सुलभ झाले. या अभ्यासपूर्ण दौऱ्यानंतर सिंधुदुर्गच्या ऐतिहासिक व सांस्कृतिक वारशाबद्दल अधिक व्यापक अभ्यास करण्याचा निर्धार या दोन्ही अभ्यासकांनी व्यक्त केला. फेब्रुवारी २०२७ मध्ये मालवण परिसरातील कातळशिल्पांचा सखोल अभ्यास करण्यासाठी पुन्हा सिंधुदुर्गात येणार असल्याचे त्यांनी स्थानिकांना सांगितले. सिंधुदुर्गातील पर्यटनाच्या पलीकडे जाऊन येथील प्राचीन इतिहास, धार्मिक परंपरा, सागरी व्यापार, वास्तुशैली, बौद्ध वारसा आणि लोकस्मृती यांचा अभ्यास करण्याचा हा उपक्रम जिल्ह्याच्या समृद्ध वारशाकडे पाहण्याची एक नवी आणि अभ्यासपूर्ण दृष्टी देणारा ठरला आहे.●●

# वंदे मातरम

## इतिहास, वास्तव आणि विपर्यास




वंदे मातरम्!” हे दोन शब्द उच्चारले की भारतीय स्वातंत्र्यलढ्याचा इतिहास, ब्रिटिश साम्राज्यवादाविरुद्धचा संघर्ष आणि मातृभूमीवरील उत्कट प्रेम डोळ्यांसमोर उभे राहते. 'दे मातरम्' हे भारत देशाचे 'राष्ट्रीय गीत' किंवा 'National Song' आहे. मात्र आज या गीताभोवती निर्माण होणाऱ्या वादाकडे भावनेपेक्षा इतिहास, तथ्य आणि घटनात्मक मूल्यांच्या आधारे पाहणे आवश्यक आहे. आजच्या राजकीय चष्म्यातून नव्हे. विशेषतः १९३७ आणि १९५० हे दोन टप्पे निर्णायक आहेत.

बंकिमचंद्र चट्टोपाध्याय यांनी वंदे मातरम्‌ची रचना केली. ते प्रथम १८७५ मध्ये बंगाली साहित्यिक व वैचारिक मासिक 'बंगदर्शन'मध्ये प्रकाशित झाले. नंतर १८८२ मध्ये बंकिमचंद्रांनी याला 'आनंदमठ' नावाच्या आपल्या कादंबरीत समाविष्ट केले. आनंदमठची पार्श्वभूमी अठराव्या शतकातील बंगालमधील अस्थिरता, दुष्काळ आणि संन्यासी-फकीर प्रतिकाराशी संबंधित आहे. बंकिमचंद्रांच्या कल्पनेत भारत ही केवळ भूमी नव्हती; ती माता होती. 'दे मातरम्‌चा अर्थ म्हणजे “हे मातृभूमी, तुला वंदन करतो.” इथे मातरम् म्हणजे केवळ जैविक आई नव्हे, तर मातृभूमी. पहिल्या दोन कडव्यांत भारतमातेचे निसर्गसंपन्न आणि सुंदर रूप दिसते, “सुजलां सुफलां मलयजशीतलाम्, शस्यश्यामलां मातरम्।” म्हणजे, जलसंपन्न, फळसंपन्न, मंद सुगंधी वाऱ्याने शीतल आणि हिरव्यागार शेतांनी नटलेल्या मातृभूमीला वंदन. परंतु या नंतरच्या कडव्यांत मातृभूमीचे रूप दुर्गा, कमला आणि वाणी या हिंदू देवीप्रतिमांशी जोडले जाते. साहित्यिक दृष्टिकोनातून हे राष्ट्रशक्तीचे प्रभावी रूपक आहे; परंतु बहुधर्मी भारताचे राष्ट्रीय गीत म्हणून ते सर्व समुदायांना समानपणे स्वीकारता येईल का, हा प्रश्न पुढे निर्माण झाला.

१९०५ च्या बंगाल फाळणीविरोधी स्वदेशी आंदोलनात वंदे मातरम्‌ला अभूतपूर्व राजकीय शक्ती प्राप्त झाली. ब्रिटिश सत्तेनेही त्याच्या प्रभावाची दखल घेत त्याच्या सार्वजनिक घोषणेला दडपण्याचा प्रयत्न केला. १८९६ मध्ये रवींद्रनाथ टागोरांनी काँग्रेसच्या कलकत्ता अधिवेशनात हे गीत गायले होते. पुढे ते स्वातंत्र्यलढ्याचे प्रभावी सांस्कृतिक प्रतिक बनले.

पहिली दोन कडवीच का? : या प्रश्नाचे उत्तर अत्यंत महत्त्वाचे आहे. १९३७ मध्ये काँग्रेस कार्यकारिणीने गीताच्या स्वातंत्र्यलढ्यातील ऐतिहासिक भूमिकेला मान्यता देत राष्ट्रीय कार्यक्रमांमध्ये पहिली दोन कडवीच गाण्याची शिफारस केली. कारण पहिल्या दोन कडव्यांत मातृभूमीचे सौंदर्य, समृद्धी आणि निसर्गाचे वर्णन आहे. पुढील कडव्यांतील देवीप्रतिमांमुळे काही मुस्लिम नेत्यांनी आक्षेप घेतले होते. कार्यकारिणीने हा आक्षेप विचारात घेत राष्ट्रीय एकात्मतेच्या दृष्टीने पहिली दोन कडवी निवडली. इथे समितीची माहिती अचूकपणे समजून घेणे आवश्यक आहे. काँग्रेस कार्यकारिणीने या प्रश्नावर विचारविनिमय केला. त्याच ठरावात राष्ट्रीय गीतांच्या संदर्भात एक चार सदस्यीय उपसमिती नेमण्यात आली. त्यात जवाहरलाल नेहरू, सुभाषचंद्र बोस, मौलाना अबुल कलाम आझाद व आचार्य नरेंद्र देव होते. या उपसमितीला उपलब्ध राष्ट्रीय गीतांचा विचार करण्याचे काम देण्यात आले आणि रवींद्रनाथ टागोरांचा सल्ला घेण्याची सूचना करण्यात आली होती. त्यामुळे ‘नेहरूंनी एकट्याने ‘वंदे मातरम्’ कापले” हा दावा या ऐतिहासिक प्रक्रियेचे एकांगी आणि अपूर्ण चित्रण आहे. नेहरू स्वतः म्हणतात की कार्यकारिणीने या प्रश्नावर दीर्घकाळ विचार करून आणि अनेक लोकांशी चर्चा करून निर्णय घेतला होता.

'जन गण मन' (राष्ट्रगान किंवा राष्ट्रगीत म्हणजेच National Anthem) हे देशाचे अधिकृत व संविधानिक प्रतिक असून ते वाजवताना किंवा गाताना सावधान मुद्रेत उभे राहणे बंधनकारक आहे व त्याचा कालावधी ५२ सेकंद असतो.

पाच कडव्यांपैकी पहिलेच का? या संदर्भात सुद्धा आणखी एक गैरसमज दूर करणे आवश्यक आहे. 'जन गण मन' हे गीतांजलीमधील गीत नाही. हे गीत मूळतः 'भारत भाग्य विधाता' (Bharoto Bhagyo Bidhata) या नावाने रचले गेले होते. टागोरांची ही स्वतंत्र बंगाली रचना असून मूळ गीत पाच कडव्यांचे आहे. मात्र स्वतंत्र भारताने राष्ट्रगीत म्हणून त्यातील पहिले कडवेच स्वीकारले. या पहिल्या कडव्यात “पंजाब, सिंध, गुजरात, मराठा, द्राविड, उत्कल, बंग” अशा विविध प्रदेशांचा उल्लेख करून भारताच्या भौगोलिक-सांस्कृतिक विविधतेतील एकात्मता व्यक्त केली आहे. म्हणजे दोन्ही गीतांच्या बाबतीत संपूर्ण साहित्यकृती राष्ट्रीय समारंभासाठी स्वीकारली गेली नाही. पण दोन्ही निवडींची कारणे सारखी नव्हती. 'वंदे मातरम्' च्या बाबतीत धार्मिक प्रतिमांशी संबंधित संवेदनशीलता महत्त्वाची होती; 'जन गण मन' च्या बाबतीत राष्ट्रगीतासाठी संक्षिप्त, सर्वभारतीय आणि औपचारिक भाग स्वीकारला गेला.



इंजी. जागेश सोमकुवर
मो.९४३५७१७२९०

संविधान सभेत २४ जानेवारी १९५० रोजी संविधान सभेचे अध्यक्ष डॉ. राजेंद्र प्रसाद यांनी जाहीर केले की “जन गण मन” भारताचे राष्ट्रगीत असेल, तर स्वातंत्र्यलढ्यात ऐतिहासिक भूमिका बजावलेल्या 'वंदे मातरम्'ला त्याच्याइतकाच सन्मान आणि समान दर्जा दिला जाईल.

राष्ट्रनिर्माते महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे भारतीय राष्ट्रवादाच्या घटनात्मक अर्थासाठी योगदान मूलभूत आहे. डॉ. बाबासाहेबांच्या राष्ट्रकल्पनेच्या केंद्रस्थानी स्वातंत्र्य, समता, बंधुता व न्याय ही मूलभूत मानवी तत्वे होती. त्यांच्या दृष्टीने राष्ट्र केवळ धर्म किंवा सांस्कृतिक समानतेवर नव्हे, तर समान नागरिकत्व आणि सामाजिक बंधुतेवर उभे राहिले पाहिजे. म्हणून भारतीय राष्ट्रवादाचा प्रवास असा मांडता येईल की “वंदे मातरम्” मातृभूमीवर प्रेम करायला शिकवते; “जन गण मन” विविधतेतून राष्ट्रीय एकात्मता पाहायला शिकवते आणि भारताचे संविधान प्रत्येक नागरिकाच्या न्याय, स्वातंत्र्य, समता आणि प्रतिष्ठेची हमी देते. म्हणूनच “वंदे मातरम्”चा सर्वोच्च सन्मान केवळ ते मोठ्याने म्हणण्यात नाही.

बंकिमचंद्रांनी मातृभूमीला माता म्हणून पाहिले; टागोरांनी त्या मातृभूमीतील विविध जनसमुदायाला एकात्मतेच्या सूत्रात बांधले आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी त्या जनसमुदायातील प्रत्येक व्यक्तीला समान नागरिकत्व, स्वातंत्र्य, समता आणि बंधुतेचा घटनात्मक अधिकार दिला. त्यामुळे ‘वंदे मातरम्’चा सर्वोच्च अर्थ घोषणेत नाही, तर त्या मातृभूमीतील प्रत्येक माणसाच्या प्रतिष्ठेच्या (dignity) रक्षणात आहे. ज्या मातृभूमीला आपण वंदन करतो, त्या मातृभूमीतील प्रत्येक नागरिकाचा सन्मान, स्वातंत्र्य आणि समान हक्क जपण्यातच तिची खरी वंदना आहे.

वंदे मातरम्!●●

# व्यक्तीची ओळख तथागत बुद्धांच्या धम्मदृष्टीतून



समाजात एखाद्या व्यक्तीची ओळख तिच्या चेहऱ्यावरून, जात-पात, संपत्ती, पद, प्रसिद्धी किंवा गोड बोलण्यावरून केली जाते. समाजमाध्यमांच्या युगात तर बाह्य दिखावा आणि प्रतिमा यांनाच अधिक महत्त्व दिले जाते. मात्र, तथागत भगवान बुद्धांनी व्यक्तीची खरी ओळख करण्यासाठी वेगळीच आणि अत्यंत वैज्ञानिक दृष्टी दिली. बुद्ध म्हणतात, माणसाला त्याच्या रूपावरून नव्हे, तर त्याच्या कर्म, आचरण, वाणी आणि मनोवृत्तीवरून ओळखा. ही शिकवण आजच्या समाजासाठी अधिकच आवश्यक ठरते. भगवान बुद्धांच्या धम्मात व्यक्तिमत्त्वाचे मूल्यांकन बाह्य स्वरूपावर नव्हे, तर अंतःकरणाच्या शुद्धतेवर केले जाते. एखाद्या व्यक्तीचा खरा स्वभाव त्याच्या रागाच्या क्षणी दिसून येतो. अनुकूल परिस्थितीत प्रत्येकजण नम्र आणि शांत दिसू शकतो; परंतु संकट, अपमान किंवा प्रतिकूल प्रसंगी जो संयम राखतो, तोच खऱ्या अर्थाने धम्माचा अनुयायी असतो. बुद्धांनी करुणा आणि मानवतेला सर्वोच्च स्थान दिले. एखादी व्यक्ती गरीब, दुर्बल, वंचित किंवा गरजू लोकांशी कसे वागते, यावरून तिच्या मनातील संवेदनशीलतेची ओळख होते. जो फक्त प्रभावशाली लोकांशी नम्र आणि दुर्बलांशी कठोर असतो, त्याचे चारित्र्य उथळ असते. खरी महानता दयाळूपणात आणि समतेच्या भावनेत आहे. सम्यक वाचा हा अष्टांगिक मार्गातील महत्त्वाचा घटक आहे. सत्य, हितकारक, प्रेमळ आणि योग्यवेळी बोललेले शब्द समाज घडवतात; तर असत्य, चुगली, कटू भाषा आणि अपमानजनक बोलणे समाजात वैर निर्माण करते. म्हणूनच व्यक्तीच्या बोलण्यापेक्षा त्यामागील सत्यता आणि हेतू महत्त्वाचा असतो. बौद्ध तत्त्वज्ञानात कर्माला सर्वोच्च स्थान आहे. बुद्धांनी स्पष्ट सांगितले की, मनुष्य आपल्या कर्मांचा वारसदार असतो. केवळ मोठमोठ्या घोषणा, धार्मिक वेशभूषा किंवा प्रभावी भाषणे यामुळे कोणी महान होत नाही. त्याच्या कृती समाजहिताच्या, प्रामाणिक आणि नैतिक असतील, तरच त्याचे व्यक्तिमत्त्व श्रेष्ठ ठरते. जीवनात लाभ आणि हानी हे दोन्ही अपरिहार्य आहेत. लाभ झाल्यावर अहंकार आणि हानी झाल्यावर द्वेष निर्माण होत असेल, तर मन अजूनही अस्थिर आहे. परंतु जो व्यक्ती यश-अपयशात समभाव राखतो, तोच खऱ्या अर्थाने प्रज्ञावान आहे. दुसऱ्यांच्या यशाकडे पाहण्याची दृष्टी हीसुद्धा व्यक्तिमत्त्वाची कसोटी आहे. बुद्धांनी मुदिता म्हणजे दुसऱ्याच्या आनंदात आनंद मानण्याचा गुण शिकविला. ईर्ष्या माणसाला आतून पोखरते, तर मुदिता समाजात बंधुभाव निर्माण करते.

एखादी व्यक्ती एकांतात कशी वागते, हे तिच्या चारित्र्याचे सर्वात खरे प्रतिबिंब असते. कोणी पाहत नसताना प्रामाणिक राहणे, चुकीच्या मार्गाला न जाणे आणि नैतिकतेचे पालन करणे हीच खरी चारित्र्यसंपन्नता आहे. चूक मान्य करण्याचे धैर्य हेही बुद्धांच्या शिकवणीत महत्त्वाचे मानले आहे. जो स्वतःच्या चुका स्वीकारून त्यातून शिकतो, तोच प्रगती करतो. इतरांवर दोषारोप करणारा व्यक्ती आत्मविकासापासून दूर राहतो. भगवान बुद्धांनी कल्याणमित्रतेचे महत्त्व सांगितले आहे. चांगली संगत व्यक्तीला योग्य विचार, योग्य आचरण आणि योग्य जीवनमार्गाकडे घेऊन जाते. वाईट संगती मात्र लोभ, द्वेष आणि मोह वाढवते. बौद्ध तत्त्वज्ञानानुसार लोभ, द्वेष आणि मोह हे मानवी दुःखाचे मूळ आहेत. ज्याच्या मनात हे तीन दोष कमी होत जातात, तो अधिक शांत, विवेकी आणि करुणामय बनतो. म्हणूनच व्यक्तीची खरी ओळख तिच्या अंतर्मनातील या प्रवृत्तींच्या आधारे करावी. कालाम सुत्त हा बुद्धांचा अत्यंत आधुनिक आणि विवेकवादी संदेश आहे. बुद्ध सांगतात की, एखादी गोष्ट केवळ परंपरा आहे, बहुसंख्य लोक मानतात किंवा एखादी मोठी व्यक्ती सांगते म्हणून ती सत्य मानू नका. स्वतः विचार करा, अनुभव घ्या आणि ती गोष्ट कल्याण, करुणा व सुखाकडे नेते की दुःख, हिंसा आणि अन्यायाकडे, याची चिकित्सा करा. आजच्या समाजात व्यक्तीचे मूल्यमापन तिच्या संपत्तीवर, जातीवर किंवा प्रसिद्धीवर न करता तिच्या सदाचार, प्रामाणिकपणा, करुणा आणि समाजाप्रती असलेल्या जबाबदारीवर झाले पाहिजे. हाच भगवान बुद्धांचा धम्म आहे आणि हाच समतामूलक, विवेकनिष्ठ व मानवतावादी समाजाचा पाया आहे. भगवान बुद्धांचा संदेश आजही तितकाच जिवंत आणि मार्गदर्शक आहे, ‘व्यक्तीला तिच्या शब्दांवरून नव्हे, तर तिच्या कर्मांवरून ओळखा. तिच्या दिखाव्यावरून नव्हे, तर तिच्या आचरणावरून ओळखा आणि इतरांशी ती कशी वागते, यावरून तिच्या मनाची दिशा समजून घ्या. हीच धम्माची खरी कसोटी आहे आणि न्याय, समता, करुणा व प्रज्ञेवर आधारित समाज घडविण्याचा शाश्वत मार्ग आहे.●●

प्रमोद जांभूळकर.
मो.९८२३९६९०९७

